**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रीमती अरुणा विठ्ठल शिंदे,<br>आर. आर. पेट्रोलपंपाच्या पाटीमागे, रामकृष्णनगर, वसमत रोड, सरकारी विहिरीजवळ, रेल्वेलाईन, परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. आर. के. कोलगणे, नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परभणी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०१-२०११ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३०-०३-२०११<br>फेरसादर दिनांक<br>१०-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०१-०१-२०११ च्या माहिती अर्जान्वये परभणी तालुक्यातील एकूण २३५ स्वस्त धान्य दुकानदाराबाबतची सन २००५ते २०१० या सहा वर्षाच्या कालावधीतील विविध अशा १६ मुद्दयांवर फार मोठ्या प्रमाणावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. त्यापैकी जी माहिती त्वरीत देणे शक्य होते अशा मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस दिनांक २५-०१-२०११ च्या पत्रान्वये कळविली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्याकरिता एकूण एक लक्ष रुपये निधी अपेक्षित आहे तसे जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांना कळविले आहे. अपिलार्थी यांनी दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र जोडले आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, परभणी यांनी सुनावणी घेऊन दिनांक २४-०२-२०११ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती पंधरा दिवसात द्यावी. अपिलार्थी यांना निधी उपलब्ध नसल्यामुळे कार्यालयात वेळेत १५ दिवसात संपर्क साधून माहितीची पाहणी करावी असे त्यांनी दिनांक २५-०१-२०११ रोजी विहित मुदतीत कळविले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस माहिती मिळाली आहे तथापि त्यांना अर्धवट माहिती मिळाली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब मोघमपणे नमूद केली आहे. अर्धवट माहिती कोणत्या मुद्दयावर मिळाली आहे हे नेमके नमूद केलेले नाही. अपिलार्थी यांचा माहितीचा मूळ अर्ज विचारात घेता मूळ अर्जाव्दारे त्यांनी सहा वर्षाची एकूण २३५ स्वस्त धान्य दुकानदारांची विस्तृत माहिती मागितली आहे ही बाब विचारात घेऊन जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी परभणी यांनी जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी यांनी माहितीची पाहणी अपिलार्थीस देण्यासाठी दिनांक २५-०१-२०११ रोजीचा घेतलेला निर्णय माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (९) नुसार योग्य ठरत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती अरुणा विठ्ठल शिंदे, आर. आर. पेट्रोलपंपाच्या पाटीमागे, रामकृष्णनगर, वसमत रोड, सरकारी विहिरीजवळ, रेल्वेलाईन, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजकुमार देविदासराव सिरस्कर, : अपीलकर्ता
मु. पो. पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पालम,
तालुका पालम, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम,
तालुका पालम, जिल्हा परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३९१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजकुमार देविदासराव सिरस्कर | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,<br>पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम,<br>तालुका पालम, जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०६-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे स्वत: अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी सन १९८० ते ३१-०१-२०११ पर्यंतच्या स्थावर मालमत्ता फेरफार नोंदीची माहिती मागितली आहे. ही माहिती त्यांना आतापर्यंत मिळाली नाही. तसेच प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम यांनी सुनावणी घेतली नाही. ही बाब योग्य नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम, जिल्हा परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम, जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार देविदासराव सिरस्कर, मु. पो. पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विठ्ठल उत्तमराव कोकर, पशुवैद्यकीय दवाखान्याजवळ, विद्यानगर, सेलू, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगाव, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विठ्ठल उत्तमराव कोकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगाव, जिल्हा हिंगोली - प्रतिनिधी - श्री. गणेश य. वाघ, नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. यावर आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थी यांनी सन १९७० ते २०१० या ४० वर्षाची विस्तृत अशी मोठ्या कालावधीची बोरखडी तालुका सेनगांव या गावातील गट नंबर २२ व पुर्वीचा नं. ४१, तसेच भोगवटदार क्रमांक १ वरील ७/१२ वरील फेरफार १२९ व फेरफार क्रमांक २० बाबत एकूण आठ मुद्दयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी ७/१२ व फेरफाराच्या प्रती दिलेल्या आहेत ही बाब अपिलार्थी यांनी मान्य केलेली आहे. या कागदपत्राच्या प्रती त्यांना मिळाल्या आहेत असे आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, हिंगोली यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. याची दखल आयोग घेत आहे. अपिलार्थी यांनी सदर माहितीची मागणी संबंधित तलाठी जे स्वतः जन माहिती अधिकारी आहेत त्यांच्याकडे करणे आवश्यक होते तसे त्यांनी केलेले नाही. तहसीलदार, सेनगांव यांनी सदरचा अर्ज संबंधित तलाठ्याकडे कलम ६ (३) नुसार वर्ग करणे योग्य ठरले असते पण त्यांनी तसे केलेले दिसत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता तसेच माहितीची मोठी व्याप्ती व ४० वर्षाचा माहितीचा कालावधी विचारात घेता आता जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सेनगाव यांना उर्वरीत कागदपत्रे संबधित तलाठ्याकडून मागवून घेऊन व अपिलार्थीस एक दिवस निश्चित करुन नोंदणीकृत टपालाने कळवून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार त्याची पाहणी द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील आवश्यक कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सेनगांव यांनी वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरीत माहिती संबंधित तलाठी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन घ्यावी व एक दिवस निश्चित करुन अपिलार्थीस पाहणीसाठी द्यावी व पाहणीनंतर त्यातील आवश्यक कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही कारवाई आयोगाचे आदेश प्राप्त होताच एक महिन्याच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विठ्ठल उत्तमराव कोकर, पशुवैद्यकीय दवाखान्याजवळ, विद्यानगर, सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगाव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. खंदारे रोहिदास किशनराव, : अपीलकर्ता
रा. बेलखेडा, पो. पाचलेगांव, तालुका जिंतूर,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कृषि अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४३९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. खंदारे रोहिदास किशनराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी - प्रतिनिधी - श्री. एल. पी. जोशी, विस्तार अधिकारी (पंचायत) | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०४-२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-०६-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०४-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०४-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खंदारे रोहिदास किशनराव, रा. बेलखेडा, पो. पाचलेगांव, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक विक्रीकर अधिकारी, विक्रीकर कार्यालय, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विक्रीकर सह आयुक्त (व्हॅट प्रशा.), विक्रीकर भवन,<br>रेल्वेस्टेशनसमोर, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक विक्रीकर आयुक्त (व्हॅट प्रशा.), परभणी<br>- श्री. मि. वि. पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विक्रीकर सह आयुक्त (व्हॅट प्रशा.), विक्रीकर भवन,<br>रेल्वेस्टेशनसमोर, नांदेड - श्री. ह. आ. सारंग | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-०४-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-०६-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त (व्हॅट प्रशा.), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त (व्हॅट प्रशा.), विक्रीकर भवन, रेल्वेस्टेशनसमोर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सर्जेराव यशवंतराव चव्हाण,<br>रा. ब्रम्हपुरी, पो. साळापुरी, तालुका जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, परभणी - प्रतिनिधी - श्री. रोडगे एम. एम., कार्यालयीन अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी<br>- प्रतिनिधी - श्री. कोणगुत्ते एम. व्ही., उप विभागीय अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०४-२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०८-०६-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी ब्रम्हपुरी या गावातील गावतळ्याबाबतची सन २००५ ते २००९ या कालावधीतील संपूर्ण माहिती जसे स्थापन केलेल्या समितीची कागदपत्रे, ॲग्रीमेंट, बाँड, रक्कम भरल्याबाबत पावती, चेक इत्यादी तपशील मागितला आहे. त्या सर्व प्रती अपिलार्थीस पोस्टाने दिनांक १७-०३-२०११ रोजी विहित मुदतीत पाठविण्यात आल्या आहेत. अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना गावतळ्याकरिता स्थापन झालेल्या समितीची कागदपत्रे मिळाली नाहीत असे नमूद केले आहे. यावर जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अशा प्रकारे समिती स्थापन झालेली नाही त्यामुळे कागदपत्रे देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

आयोगापुढे करण्यात आलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती मिळाली आहे असे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सर्जेराव यशवंतराव चव्हाण, रा. ब्रम्हपुरी, पो. साळापुरी, तालुका जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.सय्यद जावेद सय्यद वाजेद, : अपीलकर्ता
मु. पो. कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर,
तालुका जिंतूर, जिल्हा परभणी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कौसडी,
तालुका जिंतूर, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद,
परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४८० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.सय्यद जावेद सय्यद वाजेद | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर,<br>तालुका जिंतूर, जिल्हा परभणी - प्रतिनिधी - श्री. एल. पी. जोशी, विस्तार अधिकारी (पंचायत) | : उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी - श्री. एस. एच. म्हेत्रेवार | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी | : अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १५-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | २४-०३-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १०-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०८-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या स्वतःच्या जागेबाबत दिनांक ०४-०१-२०११ च्या पत्रान्वये त्यांच्या जमिनीत झालेल्या अतिक्रमणाबाबत तसेच त्यांच्या जागेतून रस्ता काढला आहे त्याबाबत बांधकाम बंद करण्याबाबत-चा तक्रार अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांच्याकडे केलेला आहे हा अर्ज दिनांक ०२-०२-२०१० रोजी त्यांनी ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कौसडी, तालुका जिंतूर यांना केलेल्या अर्जाच्या संदर्भात आहे. सदर अर्जाबाबतची माहिती ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कौसडी, तालुका जिंतूर यांच्याकडे मागितली आहे. त्यांना याबाबतची माहिती मिळाली नसून त्यांच्या जागेत त्यामुळे अतिक्रमण पूर्ण झालेले आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती मिळाली असती तर त्यांच्या जागेतील अतिक्रमण रोखता येऊ शकले असते. माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे याची गंभीर दखल आयोग घेत आहे. याकरिता या प्रकरणातील प्रथम अपिलावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी स्वतः सुनावणी घ्यावी असे आयोग निदेश देत आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन उचित निर्णय पारीत करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०३-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.सय्यद जावेद सय्यद वाजेद, मु. पो. कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल साजीद अब्दुल गफार, : अपीलकर्ता
मदिना बेकरी, राहुल नगर, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी कार्यालय माध्यमिक, जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अब्दुल साजीद अब्दुल गफार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी<br>- श्री. एन. जी. ठाकूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी परभणी जिल्ह्यातील एकूण ३७५ माध्यमिक शाळांमधील मागासवर्गीय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या जात प्रमाणपत्राबाबत एकूण तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थीने २००५ पासून ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत अशी एकूण सहा वर्षाची माहिती मागितली आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर विस्तृत माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागणार आहे. याकरिता ही माहिती अधिनियमातील कलम ७ (९) प्रमाणे देय होत नाही ही बाब आयोगास योग्य वाटते.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत प्रमाणात आहे हे कबूल केले व स्वेच्छेने माहितीची व्याप्ती कमी करुन त्यांना दोन शाळेची माहिती देण्यात यावी अशी आयोगास विनंती केली.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत दोन शाळाची नावे जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना कळवावी लागतील व त्यानंतर पुढील एक महिन्याच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने माहितीच्या प्रती विनामूल्य नोंदणीकृत टपालाव्दारे द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांना दोन शाळांची नावे कळविल्यास एक महिन्याच्या आत अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने माहितीच्या प्रती नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक 	०२-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल साजीद अब्दुल गफार, मदिना बेकरी, राहुल नगर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दत्तराव मारोतराव वैद्य, | : | अपीलकर्ता |
| रा. धारणगांव, तालुका जिल्हा परभणी | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग परभणी (ग्रामीण), परभणी | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, परभणी (ग्रामीण), परभणी - श्री. आर. ए. माकणीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | १०-०७-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०-०८-२००९
फेरसादर दिनांक
२४-०६-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये त्यांच्या जमिनीच्या संदर्भात तीन त्रयस्थांनी दिलेल्या जबाबाच्या प्रती मागितल्या आहेत. याबाबत एका त्रयस्थाने त्यास हरकत घेतल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीस माहिती देता येत नाही असा निर्णय घेतला आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांच्या-कडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाली त्यावेळी अपिलार्थी हजर होते. सुनावणीनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी, त्रयस्थ यांच्यातर्फे करण्यात आलेल्या युक्तिवाद व कागदपत्राचे अवलोकन करता जबाबाच्या प्रती अपिलार्थीस दिल्यास त्रयस्थाच्या जीवितास धोका होऊ शकतो ही बाब विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) च्या प्रमाणे माहिती देता येत नाही असा निर्णय घेऊन अपील निकाली काढले.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या दिनांक ०४-०८-२००९ च्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यामुळे कोणते जनहित साध्य होणार आहे याबाबत उल्लेख नाही.

या सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही असे आयोगाचे मत झाले आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तराव मारोतराव वैद्य, रा. धारणगांव, तालुका जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, परभणी (ग्रामीण), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. साळवे विठ्ठल किशनराव, : अपीलकर्ता
गौतमनगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५९३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. साळवे विठ्ठल किशनराव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी<br>- श्री. एन. जी. ठाकूर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थांची माहिती मागितली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी घेणे आवश्यक ठरत आहे. सुनावणी घेताना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ नुसार अपिलार्थी यांनी त्रयस्थांची माहिती मागितली असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी त्रयस्थांची बाजू ऐकून घेणे आवश्यक आहे व त्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्याचा निर्णय घेताना जन माहिती अधिकारी यांना व्यापक जनहिताच्या कसोटीवर निर्णय घ्यावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०३-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साळवे विठ्ठल किशनराव, गौतमनगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. देवानंद शंकरराव वाकळे,<br>रा.मुरुमखेडा, ता.जिंतूर जि.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ मर्या. परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक व्यवस्थापक महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ मर्या. औरंगाबाद | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा व्यवस्थापक,महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ(म),परभणी - श्री. एस.एम.चिलवंत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रभारी प्रादेशिक व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ(म),औरंगाबाद - श्री. आर.बी.पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.४.२०११ फेरसादर दि.१४.६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगासमोर सादर केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक,महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ(म),औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (म), औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.०७.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देवानंद शंकरराव वाकळे,रा.मुरुमखेडा,पो.येलदरी कॅम्प, ता.जिंतुर, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ(म),परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ(म),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पठाण मुजाहिद खॉन जाफर खॉन,<br>रा.जिंतूर, जि . परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय ,परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप प्रादेशिक परिवहन अधिकारी , परभणी | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पठाण मुजाहिद खॉन जाफर खॉन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपलेखापाल, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालय,परभणी - श्री. जी. जी. आहेर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी - श्री. एस.डी.जायभाये | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.१८.१२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कार्यालयातील एकूण ११ मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च)नुसार 'माहिती' च्या व्याख्येत जी माहिती मोडते ती माहिती अपिलार्थीस दि. १७.०१.२०११ रोजी देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २३.०३.२०११ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली नाही, असे सुनावणीच्या वेळी नमूद केल्यामुळे त्यांना पुन्हा माहिती देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्याचदिवशी अपिलार्थीस माहिती दिली.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, त्यांना अद्यापही माहिती अप्राप्त आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीचा एक संच उपलब्ध आहे. तो संच आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांनी तो स्वीकारला.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पठाण मुजाहिद खान जाफर खॉन, आमदार कॉलनी, जिंतूर,जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपलेखापाल, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिलीप पंढरीनाथ टेहरे, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
संचालक,आरोग्य सेवा,म.रा. मुंबई-१
जन अपिलीय अधिकारी तथा
संचालक,आरोग्यसेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई -१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११ /रामाआ/अपील/सिआर/१४०५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २५.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील

कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर सुनावणीच्यावेळी ते तोडगा काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २५.०३.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, आरोग्य सेवा, म.रा.मुंबई-१ यांनी अपिलार्थीच्या दि. २५.०३.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप पंढरीनाथ टेहरे, रा. अरुण ऑटो स्टोअर्स, गांधी पार्क, परभणी

२. जन माहिती अधिकारी, संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वरिष्ठ लिपिक, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन,
कार्यालय ,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपलेखापाल, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, परभणी-श्री. जी.जी.आहेर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय ,परभणी- श्री. सुधीर दि.जायभाये | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाद्वारे एकूण ७ मुद्यांवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(१)(ख) नुसार १ ते १७ मुद्यांबाबत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. काही मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली आहे व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहितीची पाहणी देण्यात यावी, असा निर्णय घेतल्याचे सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थी यांना माहिती मिळाली नाही, असे त्यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपिलार्थी यांना दोन दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन त्यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख,देशमुख गल्ली, श्री मोठा मारोतीजवळ,परभणी-४३१४०१

२. जन माहिती अधिकारी तथा उपलेखापाल, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी,उपप्रादेशिक परिवहन कार्यालय ,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.सफियोद्दीन वलीयोद्दिन काझी, : अपिलार्थी
रा.गंगाखेड जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी ,नगर परिषद कार्यालय,
गंगाखेड,जि. परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी ,नगर परिषद कार्यालय,गंगाखेड,जि. परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११ /रामाआ/अपील/सिआर/१४७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.सफियोद्दीन वलीयोद्दिन काझी | : | उपस्थित |
| ३.२ | श्री. कबीरोद्दीन काझी, अपिलार्थी यांचे मदतनीस | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - भांडारपाल,नगर परिषद, गंगाखेड,जि.परभणी - श्री.डी. एस.मोरे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगाखेड,जि.परभणी यांचेतर्फे वकील श्री. ए.व्ही.राख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे मदतनीस, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे वकील उपस्थित आहेत.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगासमोर सादर करण्यात आलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर सुनावणीच्यावेळी ते तोडगा काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झ ाालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०३.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगाखेड,जि.परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगाखेड, जि.परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.२८.०३.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सफियोद्दीन वलीयोद्दीन काझी, रा.सिव्हील कोर्टाच्या पाठीमागे, गंगाखेड, जि.परभणी - ४३१ ५१४.

२. जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल,नगर परिषद, गंगाखेड,जि.परभणी यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगाखेड,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रेणुकादास भगवंतराव वाकोडीकर ,<br>रा.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अवर सचिव (आस्था) जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई -३२ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसचिव (आस्था), जलसंपदा विभाग,मंत्रालय मुंबई -३२ | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - श्री. द.अ.शिंदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपसचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई - श्री. अतुल कोदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रत सोबत नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०११ (मुंबई कार्यालयास प्राप्त)<br>१४.०६.२०११ (औरंगाबाद कार्यालयास प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.  जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, जलसंपदा विभाग यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दि. ०७.०७.२०१० रोजीच्या अर्जान्वये शासनास दि. ०६.०७.२०१० व ०७.०७.२०१० रोजी लिहिलेल्या पत्रावर घेतलेल्या निर्णयाबाबतची माहिती मागितली आहे. सदरची माहिती सन ७५-७६ या वर्षाच्या निवडश्रेणीबाबतची आहे. अपिलार्थी यांनी वर नमूद केलेली पत्रे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (जलसंपदा) यांच्याकडे प्राप्त झालेली नाहीत. त्यामुळे माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही,असे अपिलार्थीस दि. ३०.०७.२०१० रोजी कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी यावर दि. ०५.०८.२०१० रोजीच्या पत्राद्वारे उपरोक्त दि. ०६.०७.२०१० व ०७.०७.२०१० रोजीची पत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सुलभ संदर्भासाठी सादर केलेली आहेत. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (आस्था) (जलसंपदा) यांनी दि. २६.०६.२०१० रोजीच्या प्रथम अपील फेटाळण्यात येत असल्याचे दि. २७.०९.२०१० रोजी कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही आयोगास अवगत केले आहे की, अपिलार्थी हे त्यांच्या विभागाचेच एक निवृत्त कर्मचारी असून ज्येष्ठ नागरिक आहेत म्हणून त्यांना नंतर प्राप्त झालेल्या अपिलार्थी यांच्या दोन अर्जाच्या प्रती अधीक्षक अभियंता, परीमंडळ अधिकारी,औरंगाबाद व कार्यकारी अभियंता, कालवा क्र.६ गंगाखेड जिल्हा परभणी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत व यावर कार्यवाही पूर्ण झाली असून सुधारित सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव महालेखापाल,नागपूर यांच्याकडे पाठविण्यात आला आहे व अपिलार्थीस अभिप्रेत असलेल्या अधीक्षक भांडारपाल या पदाचा मानीव दिनांक मिळाला आहे.

आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. या पार्श्वभूमीवर आयोगाचे निर्देश असे आहेत की, आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी सांगितलेली सद्यपरिस्थिती अपिलार्थी यांना कळवावी लागेल. अपिलार्थी यांना याशिवाय अधिक माहिती अभिप्रेत असल्यास त्यासाठी ते स्वतंत्र अर्ज करु शकतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक 	०२-०८-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रेणुकादास भगवंतराव वाकोडीकर, "शैलेश", रंगनाथराव महाराजनगर,परभणी - ४३१४०१

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(आस्थापना), जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव(आस्थापना), जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महादप्पा शिवलिंगअप्पा बोधने, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपसंचालक,आरोग्य सेवा,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,आरोग्य सेवा,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११ /रामाआ/अपील/सिआर/१५१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महादप्पा शिवलिंगअप्पा बोधने | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर - श्री. पी.जी.भालचे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०४.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास सांगितले की, त्यांनी नुकताच या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या

युक्तिवादात सांगितले की, त्यांना माहिती मिळाली नाही व त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणीही झालेली नाही.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे असे निर्देश आहेत की, जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्यांवर सुनावणीच्यावेळी ते तोडगा काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २२.०२.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ,लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२२.०२.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादप्पा शिवलिंगअप्पा बोधने, प्रतापनगर, नांदखेडा रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ,लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ज्ञानदेव नारायणराव दाभाडे, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषी अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,सेलू जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी ,सेलू,जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११ /रामाआ/अपील/सिआर/१५१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ज्ञानदेव नारायणराव दाभाडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,सेलू, जि.परभणी - श्री. मीर बाशीत अली | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, सेलू, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, सेलू, जि.परभणी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००९-१० व २०१०-११ या आर्थिक वर्षांमध्ये सेलू तालुक्यामध्ये त्यांच्या कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या विविध योजनेअंतर्गत झालेल्या कामासंबंधी विविध मुद्यांद्वारे विस्तृत अशी माहिती मागितली आहे. सदरची माहिती एकत्रित करुन एक महिन्याच्या आत देता येणे शक्य नव्हते. ती एकत्रित करण्यात आली आहे व ती अपिलार्थीस देण्याकरिता आज त्यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या सूचनेप्रमाणे माहितीचा संच अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांनी तो स्वीकारला. आयोगाने पुढे असेही सूचित केले की,अपिलार्थीने त्यांना उपलब्ध झालेल्या या माहितीची पहाणी करावी, त्यामध्ये काही माहिती अपूर्ण वाटल्यास जन माहिती अधिकारी यांना नेमके मुद्दे कळवावे. पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन देय होणारी मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०२-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानदेव नारायणराव दाभाडे,रि.पा.इ.(ए) जिल्हाध्यक्ष,लोकमान्यनगर,परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रल्हाद सखाराम उदावंत, : अपिलार्थी
रा. सेलू,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभाग नियंत्रक,राज्य परिवहन महामंडळ,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,राज्य परिवहन महामंडळ,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११ /रामाआ/अपील/सिआर/१५४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रल्हाद सखाराम उदावंत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,परभणी - श्री. सरदोडे गोविंद भुजंगराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,परभणी - श्री. कर्पे अरुण लक्ष्मण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०८.२००९ (फेरसादर दि.२०.०६.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,राज्य परिवहन महामंडळ, परभणी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण १० मुद्यांवर त्यांच्या सेवा कालखंडासंबंधी विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. ही सर्व माहिती प्रश्नार्थक व खुलासेवजा मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) नुसार ती माहितीच्या व्याख्येत बसत नाही. तथापि अपिलार्थी हे त्यांच्याच कार्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी (वाहनचालक) असल्याकारणाने त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या मुद्यामागे त्यांना कोणती माहिती अभिप्रेत आहे, हे विचारात घेऊन त्यांना कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली. तथापि दोन मुद्यांसंदर्भातील (सुधारित ग्रॅच्युईटी व त्यांच्या कपात केलेल्या रजेच्या कालावधीची रक्कम) माहिती त्यांना मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे सुनावणीच्या वेळी ही माहिती उपलब्ध आहे. त्या माहितीच्या आयोगाच्या कार्यालयात छायांकित प्रती घेऊन ही माहिती आयोगासमोर सुनावणीच्यावेळी समक्ष अपिलार्थीस आयोगाच्या निदेशानुसार देण्यात आल्यात. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस देय होत असलेली माहिती प्राप्त झाली या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रल्हाद सखाराम उदावंत,शासकीय विश्रामगृहासमोर (आंबराई), सेलू,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,विभागीय कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन

महामंडळ,विभागीय कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अमीन आहेमद पिता नूर आहेमद, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्राचार्य,डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अध्यापक
महाविद्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण),नांदेड
विभाग, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११ /रामाआ/अपील/सिआर/१५७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्राचार्य,डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अध्यापक महाविद्यालय,परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,नांदेड - प्रतिनिधी - श्री. दीपक देशपांडे,लघुलेखक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | ११.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ (फेरसादर दि.२१.०६.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अमीन अहेमद पिता नूर आहेमद, सेवानिवृत्त कक्ष अधिकारी,मार्फत ऊमेर किराणा स्टोअर्स, घर क्र.५९९, युसुफ कॉलनी, परभणी - ४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अध्यापक महाविद्यालय,युसुफिया कॉलनी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय व्यवस्थापक,
मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास
महामंडळ,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
व्यवस्थापकीय संचालक,
मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास
महामंडळ,मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/३४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विभागीय व्यवस्थापक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, औरंगाबाद- श्री. अभय कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ,मुंबई - श्री. गफ्फार रज्जाक शेख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८.०१.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक,मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ,मुंबई यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०५.१०.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये एकूण ४ मुद्यांवर अर्जदारानी घेतलेल्या कर्जाबाबतची व जातीच्या प्रमाणपत्रासंदर्भात माहिती मागितलेली आहे. असे एकूण १२००० कर्जदार आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्यासंदर्भात कर्जदारांच्या अर्जाची संख्या सुमारे १२००० होईल. ही माहिती एकत्रित करण्यास बराच कालावधी लागला, अशी माहिती एक महिन्याच्या आत देता येणे शक्य नव्हते. जन माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक, विभागीय व्यवस्थापक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की,अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली आहे. मुद्दा क्र. ३ ची माहिती जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक,मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ,मुंबई यांनी दि. २१.०७.२०११ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली आहे. मुद्दा क्र. २ व ४ बाबतच्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणावर आहे. या दोन मुद्यांसंदर्भातील माहिती सुमारे १२००० कर्जदाराशी संबंधित असून या कर्जदारांचे १२००० हमीदार आहेत. या माहितीशी संबंधित कागदपत्रांमध्ये संबंधित कर्जदार व हमीदारांचे ७/१२, मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे अशा कागदपत्रांचा समावेश असतो. माहितीची व्याप्ती व प्रचंड स्वरुप पाहता अपिलार्थीने या कागदपत्रांची त्यांच्या कार्यालयात पाहणी करावी, असे दि. २१.०७.२०११ रोजी कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, मुद्दा क्र.२ व ४ च्या पाहणीसाठीचे पत्र मिळाले आहे. मुद्दा क्र.३ ची माहिती त्यांना प्राप्त झाली आहे. मुद्दा क्र. १ ची माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थी यांना सर्व १२००० त्रयस्थ व्यक्तींच्या कागदपत्रांची आवश्यकता आहे, अशी भूमिका घेतली.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस मुद्दा क्र. ३ ची माहिती मिळालेली आहे व मुद्दा क्र.१ ची माहिती लवकरच मिळणार आहे, असे दिसून येत आहे. मुद्दा क्र.२ व ४ ची व्याप्ती प्रचंड असल्याकारणाने जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीची पाहणी देण्याचा घेतलेला निर्णय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) अन्वये संयुक्तिक ठरत आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या प्रतीच द्याव्यात अशी भूमिका घेतली आहे.तथापि ही माहिती त्रयस्थ व्यक्तींशी संबंधित असल्यामुळे अधिनियमातील कलम ११ नुसार संबंधित त्रयस्थ पक्षाची बाजू ऐकून घेणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही या प्रकरणी झालेली दिसून येत नाही तथापि ती करावी लागेल. पारदर्शकतेच्या तसेच नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने ही बाब कलम ११ नुसार आवश्यक आहे. अपिलार्थी यांनी एवढया

मोठया प्रमाणावर माहिती मागितली आहे, ती एकत्रित करण्यात कार्यालयाची साधनसामग्री व मनुन्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागणार आहे. ही बाब कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरु शकतो. कारण माहिती अधिकार अधिनियम २००५ मागील भूमिका व उद्दिष्टे कसे सफल होतील हा प्रश्न निर्माण होऊ शकतो. प्रसंगी केंद्रीय माहिती आयोगाने अशा माहितीच्या अर्जावर माहिती देण्याची आवश्यकता नाही, असा निर्णय घेतलेला आहे. जी माहिती देता येत आहे, ती अपिलार्थीस देण्यात आली आहे व उर्वरित माहितीची प्रचंड व्याप्ती पाहता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपिलार्थीस देऊ केली आहे. तथापि पहाणी अपिलार्थीने नाकारली आहे. या सर्व बाबी विचारात घेता सदरचे द्वितीय अपील प्रकरण आयोगाच्या स्तरावर या टप्प्यावर निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अपिलार्थी यांच्या माहितीसाठीचा अर्ज दि.०५.१०.२००९ रोजीचा आहे. या अर्जावर दोन वर्षे कार्यवाही करण्यात आली नाही, ही बाब गंभीर आहे.जी कार्यवाही करता येणे शक्य होते तो त्वरित करणे अपेक्षित होते. याकरिता जन अपिलीय अधिकारी जे या संस्थेचे प्रमुख आहेत त्यांना या माहितीसाठीच्या मूळ अर्जास चांगल्या तऱ्हेने हाताळण्यास का विलंब झाला, याची चौकशी करावी लागेल व दोषी आढळल्यास संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कार्यवाही करावी लागेल व असे प्रसंग भविष्यात उद्‌भवणार नाहीत, याबाबत उपाययोजना करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात कार्यवाही करण्यास झालेल्या विलंबाबाबत जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ,मुंबई यांनी चौकशी करुन वर नमूद केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार,हिना मंजील टाऊन हॉल, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ,औरंगाबाद, महावित्त भवन, तळमजला, स्टेशनरोड, अग्निशमन केंद्राजवळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक,मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ,डी.डी.बिल्डींग,२ रा मजला, जुने जकात घर,शहीद भगतसिंग मार्ग,मुंबई-२३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विनयकुमार दिनकर नकाते, : अपीलकर्ता
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव,
पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.०४.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०७.२००९ |

या प्रकरणाची प्रथमतः दि.२३.१२.२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थीने सुनावणीच्यावेळी आयोगास मुदत देण्याकरिता विनंती केल्यामुळे सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती व पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी

सर्व माहितीनिशी उपस्थित राहावे असे अंतरिम आदेश देण्यात आले होते. यानंतर या प्रकरणाची दि.२०.०४.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नसल्यामुळे ही सुनावणीदेखील पुढे ढकलण्यात येऊन पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे अन्यथा आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा लागेल याची नोंद घेण्याचे सुचित करण्यात आले होते.

यानंतर या व्दितीय अपिलाची आज दि.०३.०८.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे. तथापि या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची आयोग गंभीर दखल घेत आहे. सदर प्रकरणामध्ये अद्यापपर्यंत तीन वेळा सुनावणी ठेवण्यात आली असून एकाही सुनावणीच्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित झालेले नाहीत. त्यामुळे पुनश्च् सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. सदर सुनावणी ही या प्रकरणातील अंतिम सुनावणी असेल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच या सुनावणीस अनुपस्थित राहिल्यास आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन वस्तुनिष्ठ निर्णय घेण्यात येईल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक 	०३-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. 	श्री.विनयकुमार दिनकर नकाते, शिवाई निवास, गणेशनगर, उस्मानाबाद ४१३ ५०१

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, आदर्श कॉलनी, औसा रोड, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, आलूर व्दारा चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज, कव्हा रोड, लातूर ४१३ ५१२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, : अपीलकर्ता
रा.होंडाळा, ता.मुखेड, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, मुखेड, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४१८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.०१.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८.०२.२००८<br>फेरसादर दि. ३०.११.२००९ |

या प्रकरणाची प्रथमतः दि.१४.०१.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्यांनी त्यांची बाजू मांडण्यासाठी एक संधी देण्यात यावी अशी विनंती केल्यामुळे सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती व पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी

सर्व माहितीनिशी उपस्थित राहावे असे अंतरिम आदेश देण्यात आले होते. यानंतर या प्रकरणाची दि.२०.०४.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. प्रकरणात दोन्ही बांजूचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक वाटल्याने ही सुनावणीदेखील पुढे ढकलण्यात आली.

यानंतर या व्दितीय अपिलाची आज दि.०३.०८.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे. तथापि या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची आयोग गंभीर दखल घेत आहे. प्रकरणामध्ये बाजू मांडण्यासाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना एक अंतिम संधी देण्याच्या दृष्टीने सदर प्रकरणाची सुनावणी पुनश्च् पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. सदर सुनावणी ही या प्रकरणातील अंतिम सुनावणी असेल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच या सुनावणीस अनुपस्थित राहिल्यास आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन वस्तुनिष्ठ निर्णय घेण्यात येईल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक 	०३-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु.होंडाळा, पो.दापका (राजा), ता.मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जोगदंड विठ्ठल नामदेव, : अपिलार्थी
रा. जांभरुन बु.,ता.सेनगाव, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जोगदंड विठ्ठल नामदेव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.,परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.,परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो मिळाली नाही. त्याचप्रमाणे प्रथम अपिलावर सुनावणी

घेऊन निर्णय दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर सुनावणीच्यावेळी ते तोडगा काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १९.०३.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.,परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.,परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.१९.०३.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जोगदंड विठ्ठल नामदेव, मु.जांभरुन (बु.),पो.पुसेगाव,ता.सेनगाव,जि.हिंगोली-४३१ ५१३.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाबुराव खंडुजी कदम, : अपीलकर्ता
रा.वारंगा फाटा, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय,वारंगाफाटा,ता.कळमनुरी,
जि.हिंगोली.
जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिति,
कळमनुरी,जि.हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाबुराव खंडुजी कदम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत वारंगा फाटा, ता.कळमनुरी,जि.हिंगोली - श्री. श्रावणे रमेश गोमाजी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती देण्यास विलंब झाला आहे. तो क्षमापित करण्यात यावा. अपिलार्थी यांनी, त्यांना त्वरित माहिती द्यावी, असे आयोगास सांगितले.

त्यांना खालील तपशीलाप्रमाणे माहिती अभिप्रेत आहे.

१) जानेवारी,२०१० ते जानेवारी,२०११ या कालावधीत एकूण झालेल्या ग्रामसभेची संख्या व प्रत्येक ग्रामसभेमध्ये घेण्यात आलेल्या ठरावाची प्रत.

२) ग्रामसभेत केलेल्या ठरावावर केलेल्या अंमलबजावणीचा तपशील.

३) या कालावधीत घेण्यात आलेल्या सर्व वॉर्डसभा व महिलासभांची संख्या व कार्यवृत्त असल्यास त्याच्या प्रती.

ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे.ही माहिती अपिलार्थी व्यक्तिशः घेण्यास तयार आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे असे निर्देश आहेत की, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी अपिलार्थीस वर नमूद केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात निरीक्षणासाठी तयार ठेवावी व एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झालेला आहे. भविष्यात असा विलंब होऊ नये, या बाबीची जन माहिती अधिकारी यांना काळजी घ्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबुराव खंडुजी कदम,रा.वारंगा फाटा, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय, वारंगाफाटा, ता. कळमनुरी, जि.हिंगोली. यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मं.शकीब मं.युसूफ अन्सारी, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रशासकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय,हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, हिंगोली - श्री. एस.एस.दोतंलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा शल्य चिकित्सक, हिंगोली - डॉ. ए.एम.बोल्डे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.०४.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, हिंगोली यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या

माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीस दि. २७.०४.२०११ रोजीच्या पत्राद्वारे विहित मुदतीत कळविलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, हिंगोली यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, हिंगोली यांनी दि. २८.०६.२०११ रोजी सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दाखविण्यात आली. यावर अपिलार्थी यांचे समाधान झाले म्हणून अपील निकाली काढले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली आहे, अशी अपिलार्थी यांनी दि. २८.०६.११ रोजी पोच दिलेली आहे. त्या पत्राची प्रत आयोगापुढे आहे.

या सर्व बाबींचा विचार करता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मं.शकीब मं.युसूफ अन्सारी,मौलाना आझाद रोड, कोमटी गल्ली कॉर्नर,परभणी ४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रशासकीय अधिकारी,
जिल्हा सामान्य रुग्णालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय,हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११ /रामाआ/अपील/सिआर/१६०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, हिंगोली - श्री. एस.एस.दोतंलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा शल्य चिकित्सक, हिंगोली - डॉ. ए.एम.बोल्डे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.०४.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, हिंगोली यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दि. ३०.०३.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर एकंदर शुल्क ₹२५०/- चा भरणा करावा, असे दि.२७.०४.२०११ रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केला नसल्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही.

अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, शुल्काचा भरणा करण्यासाठीचे पत्र त्यांना उशिरा प्राप्त झाले व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीचा छायांकित प्रतींचा एक संच तयार आहे. तो आयोगाच्या निर्देशाप्रमाणे अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांनी तो स्वीकारला. या माहितीची अपिलार्थी यांनी प्रथम पाहणी करावी व त्या माहितीमध्ये काही मुद्यांची माहिती अपूर्ण आढल्यास पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे व जन माहिती अधिकारी यांना पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन मुद्देनिहाय उर्वरित माहिती द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख, श्री मोठा मारोती जवळ, देशमुख गल्ली, परभणी - ४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मो.नाजीम मो. कासीम सिध्दीकी, : अपीलकर्ता
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग सेलू, जि. परभणी - श्री. हेमंत रामराव नागदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | १०.०५.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०६.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग सेलू, जि.परभणी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ११.०४.२०११ रोजीच्या मूळ अर्जान्वये मौ. हमदापूर, ता.मानवत, जि.परभणी येथील पाणी पुरवठा योजनेच्या पाण्याच्या टाकीसंदर्भात एकूण चार मुद्यांवर व्यक्तिशः माहिती मागितली आहे. सदरची माहिती विहित मुदतीत दि.१६.०५.२०११ रोजी पोस्टाने पाठविण्यात आली होती. त्यापूर्वी अपिलार्थीस दि.१२.०५.२०११ रोजी व्यक्तिशः माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती अस्पष्ट व अपुरी दिली आहे, असे मोघमपणे नमूद केले आहे. अस्पष्ट म्हणजे नेमके काय, हे अपिलार्थी यांनी नमूद केले नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांना देय असलेली माहिती देण्यात आली आहे, असे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मो.नाजीम मो. कासीम सिध्दीकी,वृत्तपत्र छायाचित्रकार, दर्गारोड, गालीबनगर, राहत हॉस्पीटलचे बाजुला,परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा,उपविभाग सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विनयकुमार दिनकर नकाते, : अपीलकर्ता
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव,
पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विनयकुमार दिनकर नकाते, शिवाई निवास, गणेशनगर,उस्मानाबाद - ४१३ ५०१.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव,पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष,पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नंदकिशोर शंकराव कदम, : अपीलकर्ता
रा.उस्मानाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय पोलीस अधिकारी, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नंदकिशोर शंकराव कदम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधीक्षक व एस.डी.पी.ओ.उस्मानाबाद - श्री. माधव गोविंदराव कारभारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उस्मानाबाद यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीच्या

अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये तारखांचा उल्लेख नाही. तो मिळावा. ही बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उस्मानाबाद यांना अपिलार्थीस सुधारित माहिती द्यावी लागेल. याबाबत यापूर्वी कळविले गेले असले तरी पुन्हा एकदा नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस सुधारित माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदकिशोर शंकराव कदम/८०४,सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक,पोलीस नियंत्रण कक्ष, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक व एस.डी.पी.ओ.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नंदकिशोर शंकराव कदम, : अपीलकर्ता
रा.उस्मानाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय पोलीस अधिकारी, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नंदकिशोर शंकराव कदम | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधीक्षक व एस.डी.पी.ओ.उस्मानाबाद - श्री. माधव गोविंदराव कारभारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उस्मानाबाद यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या

माहितीच्या संदर्भात याबाबतच्या माहितीच्या अर्जान्वये त्यांना माहिती दिलेली आहे. त्यामध्ये अपिलार्थी यांना अपेक्षित केलेल्या तारखांचा उल्लेख आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात त्यांनी मागितलेल्या माहितीमध्ये फक्त त्यांना तारखा कळवावयाच्या आहेत, असा खुलासा दिला. ही बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांना कळवावी लागेल. याबाबत यापूर्वी कळविले गेले असले तरी पुन्हा एकदा नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांना कळवावी लागेल. याबाबत यापूर्वी कळविले गेले असले तरी पुन्हा एकदा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य कळवावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदकिशोर शंकरराव कदम/८०४,सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक,पोलीस नियंत्रण कक्ष, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक व एस.डी.पी.ओ.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अतुल दिलीपप्रसाद दुबे, : अपीलकर्ता
रा.परळी, जि.बीड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, परळी वैजनाथ, जि.बीड
जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७ /रामाआ/अपील/सिआर/२९४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अतुल दिलीपप्रसाद दुबे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, परळी (वै.), जि.बीड - श्री. एस.पी.वाघमारे | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद - श्री. पी.टी.वायचळ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.११.२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.१२.२००७ |

या द्वितीय अपील प्रकरणाची सुनावणी प्रथम दि. १३.०१.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. मुख्याधिकारी, नगर परिषद, परळी

वैजनाथ दीर्घ मुदतीच्या वैद्यकीय रजेवर गेले असल्यामुळे सुनावणीची पुढील तारीख मागण्यात आली होती. पुढील सुनावणी दि. २०.०४.२०११ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. त्यावेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे सुनावणी पुन्हा पुढे ढकलण्यात आली होती. सदर प्रकरणात आज दि. ०३.०८.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०१.०९.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे.

" १) श्री. सोमनाथ भाऊसाहेब हरकाळ यांनी दि. ११/०६/२००७ रोजी न.प.सदस्य देविप्रसाद पांडे यांच्या विषयी माहिती अधिकाराच्या अनुषंगाने माहीती मागीतली होती. या माहीती अधिकारामध्ये अतुल दुबे यांचा काही सबंध आहे का? असल्यास कार्यालयाच्या आवक जावक रजिस्टरला याची नोंद आहे का? असल्यास त्याची माहीती दयावी.

२) दि. २०/०६/२००७ रोजी नगरपालीका जावक क्रं.3008/07 या पत्रात अतुल दुबे यांच्या नावाचा उल्लेख केला असुन दुबे हे सोमनाथ हरकाळ यांच्या सोबत अर्ज देताना होते असा उल्लेख आहे, अतुल दुबे हे सोबत होते याचा आपणाकडे लेखी पुरावा आहे का असल्यास त्याचा खुलासा करावा व दि. ३०/०६/२००७ जावक क्रं. 3008/07 पत्राची नक्कल देण्यात यावी. "

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादाद्वारे प्रकरणाची पार्श्वभूमी व सद्यस्थितीची माहिती आयोगास सादर केली. दोनही बाजूंनी सादर केलेला युक्तिवाद व कागदपत्रे यावरुन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीचा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील ज्या कागदपत्रांमध्ये समावेश असण्याचा संभव आहे, ती कागदपत्रे अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होत आहेत, असे आयोगाचे मत आहे. ती खालीलप्रमाणे आहेत.

१) श्री. सोमनाथ हरनाळ यांनी श्री. देविप्रसाद पांडे यांच्यासंदर्भात मागितलेल्या माहितीसाठीच्या अर्जाची छायांकित प्रत.

२) आवक रजिस्टरच्या पृष्ठाची (ज्या पृष्ठावर श्री. सोमनाथ हरनाळ यांच्या संदर्भिय अर्जाची नोंद आहे) प्रत.

३) दि. ३०.०६.२००७ रोजी न.प.जा.क्र.3008/2007 या पत्राची प्रत.

यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांनी संदर्भित माहितीसाठीच्या अर्जाची व दि. ३०.०६.२००७ रोजी न.प.जा.क्र.3008/2007 ची प्रत अपिलार्थीस यापूर्वीच दिली आहे. ही प्रत अपिलार्थीस मिळाली आहे, असे अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये मान्य केले व आवक रजिस्टरची प्रत आयोगासमोर दिली. तथापि अपिलार्थी यांना एवढया साध्या मुद्यांवर माहिती देण्यास विलंब झालेला आहे, ही बाब नाकारता येणार नाही, असे आयोगाचे मत आहे. या

विलंबाबाबत संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहकारी अधिकारी/कर्मचारी या सर्वांना ₹५०००/- इतकी एकत्रित शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांना आयोगास करावा लागेल. मुख्याधिकारी,न.प.परळी (वै) यांना चौकशी करावी लागेल व दोषी कर्मचाऱ्यांविरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही योजावी लागेल. मुख्याधिकारी,नगर परिषद,परळी (वै.),जि.बीड यांनी ही कार्यवाही तीस दिवसांच्या आत करुन याबाबतचा प्रस्ताव आयोगास सादर करावा, असे आयोगाचे निर्देश आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहकारी अधिकारी/कर्मचारी या सर्वांना एकत्रित ₹५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, यांचा खुलासा हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सादर करावा.

२) मुख्याधिकारी,नगर परिषद,परळी (वै.),जि.बीड यांनी वर नमूद केलेली कार्यवाही आयोगाचे प्रस्तुत आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करुन याबाबतचा प्रस्ताव आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अतुल दिलीपप्रसाद दुबे,प्रियानगर,परळी वैजनाथ, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद,परळी (वै.),जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दिलीप पंढरीनाथ टेहरे,<br>अरुण ऑटो स्टोअर्स, गांधी पार्क, परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>राज्य उत्पादन शुल्क विभाग, नागपूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>राज्य उत्पादन शुल्क विभाग, नागपूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, नागपूर<br>- प्रतिनिधी - श्री. व. म. शिंदे, कार्यालय अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, नागपूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ स्नेहल एंटरप्रायझेस, नागपूर यांच्याबाबत एकूण सात मुद्दयावर माहिती मागितली आहे. ही माहिती त्यांना दिनांक १७-०२-२०११ रोजी स्पीड पोस्टाने पाठविण्यात आली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १५-०३-२०११ रोजी सुनावणी ठेवली होती तथापि अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद पाठविला आहे. त्यावर सुनावणीच्या दरम्यान माहिती अधिकारी यांनी लेखी म्हणणे सादर केले त्याची प्रत दिनांक १७-०३-२०११ रोजी स्पीड पोस्टाने अपिलार्थीस पाठविण्यात आली आहे व दिनांक २२-०३-२०११ रोजी पुन्हा सुनावणीची संधी दिली आहे. तथापि अपिलार्थी दिनांक २२-०३-२०११ रोजीही उपस्थित झाले नाहीत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन वरील बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी आज रोजी सुनावणीस अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या दिनांक १५-०४-२०११ च्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाली आहे असे दिसून येत आहे. तथापि एका मुद्दयावर म्हणजे जिल्ह्याबाहेर पुरवठ्याचे स्पिरीट वाहतुकीस बॉटलींग पर्यवेक्षणबाबत परिपत्रक त्यांना प्राप्त झाले नाही. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने याबाबत शासनाचे पत्रक अपिलार्थीस दिले आहे असे सुनावणीच्या वेळी सांगितले तथापि त्याची प्रत पुन्हा अपिलार्थीस संबंधित शासनाचे पत्रक व त्यांच्या कार्यालयाने निर्गमीत केलेल्या पत्राच्या प्रतीसह पंधरा दिवसात पाठविण्यात यावे असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप पंढरीनाथ टेहरे, अरुण ऑटो स्टोअर्स, गांधी पार्क, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दत्ता भुजाजी थोरात,<br>सिध्दार्थनगर, औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, सरस्वती आश्रमशाळा, नागेशवाडी,<br>तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट,<br>उप कार्यालय, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दत्ता भुजाजी थोरात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, सरस्वती आश्रमशाळा, नागेशवाडी,<br>तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली<br>- श्री. व्ही. पी. नागरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट, उप कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २८-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये त्यांच्या शाळेची एकूण आठ मुद्दयावर विस्तृत माहिती मागितली आहे. दहावी व बारावीच्या परीक्षेकरिता शिक्षक व्यस्त असल्यामुळे आणि कर्मचारी कमी असल्यामुळे हि माहिती एकत्रित करण्यास थोडा कालावधी लागला व अपिलार्थीस दिनांक ३१-०३-२०११ रोजी माहिती देण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना माहिती प्राप्त झाली आहे तथापि काही माहिती अपूर्ण आहे ती खालीलप्रमाणे आहे.

१. मुद्दा क्रमांक ४ मध्ये एकूण विद्यार्थ्यांची संख्या व यादी मागितली आहे व त्यांना साबण, टुथपेस्ट, खोबरेतेल वगैरे महिन्यातून किती मिळते याची माहिती मागितली आहे - यावर जन माहिती अधिकारी यांनी सदरची यादी व तपशील अपिलार्थीस देण्यात आला आहे असे सांगितले व त्याची प्रत मिळाल्याचे अपिलार्थीने मान्य केले.

२. मुद्दा क्रमांक ७ मध्ये अपिलार्थी यांनी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या परत करण्यात आलेल्या फीची माहिती मागितली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, विद्यार्थ्यांची फी शासनाकडून परत आल्यावर त्यांच्याकडे येत नाही ती संस्थेकडे नियमाप्रमाणे जाते. यावर अपिलार्थीचे समाधान झाले.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्ता भुजाजी थोरात, सिध्दार्थनगर, औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सरस्वती आश्रमशाळा, नागेशवाडी, तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट, उप कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. यशवंत गणपत नांगरे,<br>व्दारा, लागवड अधिकारी, हिंगोली, नाईकनगर, रामाकृष्णा हॉटेलच्या मागे, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर - प्रतिनिधी - श्री. मुखम डी. एस., जनसंपर्क अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०३-२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-०६-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०२-१२-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ श्री. सटवाजी जळबाजी शेरे यांनी जात पडताळणीकरिता दाखल केलेल्या सर्व दस्ताऐवजाच्या साक्षांकीत प्रती मागितल्या आहेत. यावर प्रथम प्रतिसाद देऊन दिनांक १३-०१-२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विचारले की, सदरचे प्रकरण सेवा, निवडणूक अथवा विद्यार्थी यापैकी कोणते आहे त्याचा उल्लेख आपल्या अर्जात नाही. प्रकरण दाखल केल्याची पोच सादर केल्यास माहिती देणे सुलभ होईल. अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक १४-१२-२०१० रोजी प्राप्त झाला आहे. त्यानंतर अपिलार्थी यांना कळविण्यात आले आहे की, त्रयस्थाचा प्रस्ताव अपूर्ण असल्यामुळे तो त्यांना परत करण्यात आला आहे व याबाबतची नोंदवहीची छायांकीत प्रत दिनांक ११-०३-२०११ रोजी अपिलार्थीस पाठविण्यात आली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दोनदा सुनावणी घेतल्याचे आढळून येत आहे. दोनही वेळेच अपिलार्थी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीत अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली आहे या निर्णयाप्रत येऊन सदरील प्रकरण निकाली काढले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. यशवंत गणपत नांगरे, व्दारा, लागवड अधिकारी, हिंगोली, नाईकनगर, रामाकृष्णा हॉटेलच्या मागे, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सफियोद्दीन वलीयोद्दीन काझी, : अपीलकर्ता
सिव्हिल कोर्टाच्या पाठीमागे, गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४७९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सफियोद्दीन वलीयोद्दीन काझी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी - श्री. भाऊसाहेब थोरात | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११-०३-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६-०५-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात उप विभागीय अधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०३-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १६-०५-२०११ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयासंदर्भात आयोगापुढे त्यांची विशेष साक्ष आवश्यक ठरत आहे. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी व्यक्तिशः तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी विशेष साक्षीसाठी उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः व जन अपिलीय अधिकारी यांनी विशेष साक्षीसाठी उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सफियोद्दीन वलीयोद्दीन काझी, सिव्हिल कोर्टाच्या पाठीमागे, गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ज्ञानदेव नारायणराव दाभाडे, : अपीलकर्ता
लोकमान्यनगर, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, जिंतूर,
जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, जिल्हा परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५१४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ज्ञानदेव नारायणराव दाभाडे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, जिंतूर,<br>जिल्हा परभणी - श्री. सिराज मोहीयोद्दीन | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, जिल्हा परभणी<br>- श्री. बी. आर. वाघ | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २२-०२-२०११ च्या अर्जान्वये जिंतूर तालुक्यातील सन २००९-१० व २०१०-११ या दोन आर्थिक वर्षाच्या कालावधीत करण्यात आलेल्या त्यांच्या तालुक्यातील सर्व योजना अंतर्गत कामाची सविस्तर माहिती कामनिहाय, गटनिहाय व गावनिहाय तसेच कोणत्या पर्यवेक्षकाच्या हातावर काम झाले, मजूरपटाच्या व मोजमाप पुस्तिकेच्या छायाप्रतीसह मागणी केली आहे. ही माहिती आठ उपविभागाकडे विखुरलेली आहे ही माहिती एकत्रित करुन अपिलार्थीस एका महिन्याच्या आत देणे शक्य नव्हते. हजेरीपटाच्या प्रती व मोजमापाच्या सर्व कामाच्या प्रती त्यांनी मागितल्या आहेत ही बाब सोडून इतर माहिती आज त्यांच्याकडे उपलब्ध आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक १०-०५-२०११ व दिनांक २७-०५-२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. जन अपिलीय अधिकारी यांनी ती पुढे ढकलली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व तदनंतर दिनांक २७-०६-२०११ रोजी दुसरी सुनावणी ठेवण्यात आली.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना आतापर्यंत माहिती प्राप्त झाली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणी तारखेला जन अपिलीय अधिकारी उपस्थित नसल्यामुळे सुनावणी होऊ शकली नाही. त्यांना माहिती विहित मुदतीत न मिळाल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

आज रोजी जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे ती आयोगाने सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थीने ती स्विकारली. अपिलार्थी यांनी त्या माहितीची पाहणी करावी व त्यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

आयोगास पुढे असेही दिसून आले की अपिलार्थी यांनी तालुक्यातील सर्व कामांच्या मोजमाप पुस्तिकांच्या प्रती व मजूरपटाच्या प्रती मागितल्या आहेत. अशी व्यापक माहिती मागणे व्यवहार्य ठरत नाही. सार्वजनिक प्राधिकरणाकडील साधनसामग्री तसेच मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या मोजमाप पुस्तिकेच्या प्रती, व हजेरीपटाच्या प्रती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन देणे उचित ठरत आहे. पाहणीनंतर त्यातील

काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थी यांनी दोन वर्षाची संपूर्ण तालुक्यातील विविध योजनेतील कामांची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या वर नमूद केलेल्या युक्तिवादाप्रमाणे अशी माहिती एका महिन्याच्या एकत्रित करुन देणे शक्य होत नाही हा युक्तिवाद मान्य करण्याजोगा आहे. त्यामुळे या कारणास्तव शास्ती कलम २० (१) नुसार लावणे योग्य ठरत नाही असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे दिलेल्या माहितीपैकी अपूर्ण माहितीबाबत कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मोजमाप पुस्तिकेच्या प्रती, मोजमाप व हजेरीपटाच्या प्रती यासंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानदेव नारायणराव दाभाडे, लोकमान्यनगर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, जिंतूर, जिल्हा

परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महादप्पा शिवलिंगअप्पा बोधने, : अपीलकर्ता
प्रतापनगर, नादखेडा रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उपसंचालक, आरोग्य सेवा, महावीर चौक, बाबा पेट्रोल पंप, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपसंचालक, आरोग्य सेवा, महावीर चौक, बाबा पेट्रोल पंप, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महादप्पा शिवलिंगअप्पा बोधने | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य प्रशासकीय अधिकारी, कार्यालय उपसंचालक आरोग्य सेवा, महावीर चौक, बाबा पेट्रोल पंप, औरंगाबाद<br>- श्री. एस. एम. माहोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक, आरोग्य सेवा, महावीर चौक, बाबा पेट्रोल पंप, औरंगाबाद - डॉ. आर. बी. कसबे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३-०२-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०३-२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-०६-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब त्यांच्या युक्तिवादात सुनावणीच्या वेळी मान्य केली. तथापि त्यांना संपूर्ण माहिती मिळाली नाही असे आयोगास सांगितले. आयोगाने सूचित केल्यावर त्यांनी खालीलप्रमाणे माहिती मिळाली नाही असे सांगितले.

१. मुद्दा क्रमांक १ मध्ये संचालक वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांच्याकडून उप संचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांना यादी प्राप्त झाली आहे काय, असल्यास त्याचा तपशील अपिलार्थीने मागितला आहे. यावर उप संचालक यांनी खुलासा केला की, अशी यादी संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांच्याकडून त्यांना प्राप्त झाली नाही.

२. मुद्दा क्रमांक २ मध्ये उमेदवारांची उमेदवारी मागणीकरिता जाहिरात दिली असल्यास त्याचा तपशील दिला आहे काय असल्यास त्याची यादी मिळावी. यावर जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांनी खुलासा केला की, त्यांच्या कार्यालयातर्फे अशी जाहिरात काढण्यात आली नाही.

३. मुद्दा क्रमांक ४ मध्ये उर्वरीत उमेदवाराची यादी उप संचालक यांनी संचालक यांना पाठवावयाची असते त्याचा तपशील मागितला आहे. यावर उप संचालक यांनी खुलासा केला की अशा प्रकारची यादी पाठविण्यात आलेली नाही.

वर नमूद केल्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांनी दिलेली माहिती अपिलार्थीस पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरुपात कळवावी लागेल. या पार्श्वभूमीवर सदरचे प्रकरण या स्तरावर बंद करण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादप्पा शिवलिंगअप्पा बोधने, प्रतापनगर, नादखेडा रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, कार्यालय उपसंचालक आरोग्य सेवा, महावीर चौक, बाबा पेट्रोल पंप, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, महावीर चौक, बाबा पेट्रोल पंप, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपीलकर्ता
शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
मानवत, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
मानवत, जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>मानवत, जिल्हा परभणी - श्री. व्ही. एल. राठोड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>मानवत, जिल्हा परभणी - श्री. डी. बी. कांबळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २५-०२-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-०३-२०११ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५-०३-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष यल्हाजी बांगर, : अपीलकर्ता
मंगळवारा बाजार, हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
लिपिक, पाणीपुरवठा विभाग, नगरपरिषद कार्यालय, हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५८५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा लिपिक, पाणीपुरवठा विभाग, नगरपरिषद कार्यालय, हिंगोली - श्री. रघुनाथ विश्वनाथ बांगर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली - डॉ. प्रदीप दगडुजी ठेंगळ | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२-०६-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०७-०३-२०११ च्या माहिती अर्जान्वये UIDSSMT या योजनेच्या कामाची विस्तृत अशी माहिती विविध मुद्दयावर जसे मंजूरी आदेश, निविदा प्रक्रिया, निविदा मंजूरी ठराव, एम. बी. रेकॉर्ड, बिलाच्या प्रती, संपूर्ण संचिकेच्या कार्यालयीन टिपणीच्या प्रती यांचे अवलोकन मागितले आहे. सदरची माहिती एकत्रित करण्यासाठी काही कालावधी गेला. त्याचप्रमाणे यापूर्वी दिनांक १५-०३-२०१० रोजी याच कामाची माहिती अपिलार्थीने दुस-या माहिती अर्जान्वये मागितली आहे ती त्यांना देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना माहितीची पाहणी करावी अशी व्यक्तिशः संपर्क साधून विनंती करण्यात आली होती. परंतु अपिलार्थीने प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती देण्याकरिता विलंब झाला आहे याकरिता जन माहिती अधिका-यास सक्त ताकीद दिली आहे व अपिलार्थीस पंधरा दिवसाच्या आत माहिती द्यावी असा दिनांक ०२-०६-२०११ रोजी निर्णय दिला आहे. यानुसार दिनांक ०४-०६-२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संचिका पाहण्यासाठी उपस्थित राहावे असे कळविले. तथापि सदरचे पत्र त्यांच्या कार्यालयास परत आले. यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक १०-०६-२०११ रोजी कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून संचिकेची पाहणी केली आहे व त्यांना आवश्यक असलेल्या १७० पृष्ठांच्या छायांकीत प्रती विनामूल्य देण्यात आल्या आहेत.

या सर्व बाबी विचारात आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष यल्हाजी बांगर, मंगळवारा बाजार, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपिक, पाणीपुरवठा विभाग, नगरपरिषद कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माधव बापुराव भिसे, : अपीलकर्ता
मु. पो. पिंपरी (झोला), तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५९६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. माधव बापुराव भिसे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी - श्री. पां. रा. चव्हाण | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५-०५-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहे.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी यांच्या दिनांक २५-०५-२०११ रोजीच्या निर्णयावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी देवि अनुसया माता मठ संस्थान, पिंपरी (झोला), तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी या ट्रस्टबाबत खालील तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे.

१. यादवगीर गुरु आवधूतगीर यांनी संस्था रजिस्टर्ड करतेवेळी केलेल्या अर्जाची प्रत.

२. नरेंद्रगीर गुरु यादवगीर यांची अर्चक म्हणून नेमणूक केलेल्या कागदपत्राची प्रत,

३. १९८५ ते २००९ दरम्यान खर्चाचा हिशोब (audit report)

सदरच्या मठ हा खाजगी ट्रस्ट आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ त्याला लागू होत नाही. तथापि या अधिनियमाच्या कलम २ (च) मध्ये जी माहितीची व्याख्या केली आहे त्यामध्ये ही माहिती खाजगी प्राधिकरणाकडे आहे व सार्वजनिक प्राधिकरणाला ही माहिती प्राप्त करुन घेता येऊ शकते. अशी माहिती, माहितीच्या व्याख्येत येते त्यामुळे वरील तीनही मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी यांच्या निर्णयावरुन असे दिसून येते की, संबंधित संचिका गहाळ झाली आहे व त्याचा शोध हिंगोली जिल्हा नव्याने झाल्यामुळे येथे करणे आवश्यक आहे. हिंगोली येथे सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय आता निर्माण झाले आहे. सदर प्रकरण १९७२ चे आहे. हिंगोली किंवा परभणी येथे संचिका उपलब्ध असणे आवश्यक आहे. या दोनही कार्यालयाकडून संचिकेचा शोध घेण्याकरिता विशेष पथक तयार करण्यात यावे असे आयोगाचे मत आहे. धर्मदाय सह आयुक्त, औरंगाबाद यांनी ही बाब व्यक्तिशः पहावी असे आयोगाचे निदेश आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

श्री. खोत, धर्मदाय सह आयुक्त, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संचिकेचा शोध घेण्याकरिता दोन कर्मचा-याचे एक विशेष पथक तयार करुन हिंगोली व परभणी कार्यालयात शोध घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याची व्यवस्था करावी. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच दोन महिन्याच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०८-२०११**

---------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माधव बापुराव भिसे, मु. पो. पिंपरी (झोला), तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. धर्मादाय सह आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. ज्ञानोबा रामभाऊ भिसे,<br>मु. पो. पिंपरी (झोला), तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ज्ञानोबा रामभाऊ भिसे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी - श्री. पां. रा. चव्हाण | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-०५-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहे.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी यांच्या दिनांक २५-०५-२०११ रोजीच्या निर्णयावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी देवि अनुसया माता मठ संस्थान, पिंपरी (झोला), तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी या ट्रस्टबाबत नरेंद्रगीर गुरु यादवगीर यांची अर्चक म्हणून नेमणूक केलेल्या कागदपत्राची माहिती मागितली आहे.

सदरच्या मठ हा खाजगी ट्रस्ट आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ त्याला लागू होत नाही. तथापि या अधिनियमाच्या कलम २ (च) मध्ये जी माहितीची व्याख्या केली आहे त्यामध्ये ही माहिती खाजगी प्राधिकरणाकडे आहे व सार्वजनिक प्राधिकरणाला ही माहिती प्राप्त करुन घेता येऊ शकते. अशी माहिती, माहितीच्या व्याख्येत येते त्यामुळे वरील मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी यांच्या निर्णयावरुन असे दिसून येते की, संबंधित संचिका गहाळ झाली आहे व त्याचा शोध हिंगोली जिल्हा नव्याने झाल्यामुळे येथे करणे आवश्यक आहे. हिंगोली येथे सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय आता निर्माण झाले आहे. सदर प्रकरण १९७२ चे आहे. हिंगोली किंवा परभणी येथे संचिका उपलब्ध असणे आवश्यक आहे. या दोनही कार्यालया-कडून संचिकेचा शोध घेण्याकरिता विशेष पथक तयार करण्यात यावे असे आयोगाचे मत आहे. धर्मदाय सह आयुक्त, औरंगाबाद यांनी ही बाब व्यक्तिशः पहावी असे आयोगाचे निदेश आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

श्री. खोत, धर्मदाय सह आयुक्त, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संचिकेचा शोध घेण्याकरिता दोन कर्मचा-याचे एक विशेष पथक तयार करुन हिंगोली व परभणी कार्यालयात शोध घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याची व्यवस्था करावी. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच दोन महिन्याच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानोबा रामभाऊ भिसे, मु. पो. पिंपरी (झोला), तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, परभणी विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. धर्मादाय सह आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माधव शंकरराव भिसे, : अपीलकर्ता

जान्हवी, रुद्रेश्वर मंदिर जवळ, विद्यानगर, एल. आय. सी. कॉलनी, रिंग रोड, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

लेखापाल, नगर परिषद कार्यालय, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०३२

२ सुनावणीची तारीख दि. ०४-०८-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

लेखापाल, नगर परिषद कार्यालय, लातूर

- प्रतिनिधी - श्री. ओ. एस. मुतंगे, कर अधीक्षक

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर

- डॉ. धनंजय जावळीकर

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २०-०२-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १६-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २०-०२-२०१० च्या माहितीच्या अर्जान्वये एकूण दोन मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यामधील पहिला मुद्दा सन २००५ ते २००७ मधील रिंगरोड ते शनिदेव मंदिर ते आबासाहेब पाटील घरापर्यंत नाली व रस्ता करणे या कामाच्या व्हावचरच्या प्रती मागितल्या आहेत व मुद्दा क्रमांक २ मध्ये मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी दिलेल्या चौकशी अहवालाची प्रत मागितली आहे. अपिलार्थी यांना मुद्दा क्रमांक १ ची माहिती दिनांक २३-०७-२००८, ०२-०२-२०१० व १९-०३-२०१० अशी तीन वेळेस देण्यात आली असूनही परत दिनांक २८-०७-२०११ रोजी देण्यात आली आहे व जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्याची पोहोच प्राप्त झाली आहे. मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी चौकशी केली नसल्यामुळे चौकशी अहवालाची प्रत त्यांना देता आली नाही.

अपिलार्थी यांनी केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी सुनावणी घेतली तेव्हा अपिलार्थी उपस्थित होते व दिनांक १२-०५-२०१० रोजी नगरपरिषदेकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिली असल्याने अपील फेटाळण्यात येत असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी दिनांक ०१-०८-२०११ च्या पत्रान्वये आयोगास लेखी निवेदन सादर केले आहे. त्यामध्ये त्यांना आवश्यक त्या प्रती मिळाली नाहीत असे नमूद केले आहे व हे नमूद करताना त्यांना हव्या असलेल्या माहितीमध्ये नमूद केलेल्या बिलाच्या चेक क्रमांकाचा तपशील दिला आहे. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात लेखा अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या मूळ माहिती अर्जात हा तपशील त्यांनी पूर्वी देणे आवश्यक होते. त्यामुळे त्यांना नेमकी माहिती देय होऊ शकत होती हि सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली आहे.

आयोगासमोर केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रावरुन आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही. अपिलार्थी यांनी आता दिलेले तपशील विचारात घेणे आवश्यक नाही असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माधव शंकरराव भिसे, जान्हवी, रुद्रेश्वर मंदिर जवळ, विद्यानगर, एल. आय. सी. कॉलनी, रिंग रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, : अपीलकर्ता
मु. टेंभुर्णी, पोस्ट तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध कागदपत्रावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, मु. टेंभुर्णी, पोस्ट तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. काकासाहेब मारुती घुटे,<br>दै. जनसंचार, पत्रकार भवन समोर, पं.स. जवळ, लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अग्निशमन अधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर<br>- श्री. सुतार ए. के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर - डॉ. धनंजय जावळीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०३-२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये एका अपघाताच्या संदर्भात गाडीची माहिती मागितली आहे. ती माहिती हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे देता येत नाही असे दिनांक ०१-०४-२०१० रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यावर अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिनांक ०५-०५-२०१० रोजी घेण्यात आला आहे. त्यानुसार माहिती तयार ठेऊन ती दिनांक २८-०५-२०१० रोजी खास दुतामार्फत अपिलार्थीस देण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीचे व्दितीय अपील दिनांक २५-०५-२०१० चे आहे व त्यांना दिनांक २८-०५-२०१० रोजी माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काकासाहेब मारुती घुटे, दै. जनसंचार, पत्रकार भवन समोर, पं.स. जवळ, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अग्निशमन अधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पाटील यशवंत दत्तराव, : अपीलकर्ता
संपादक, दै. मांजरा काठ, केशवनगर, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०३५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अग्निशमन अधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर<br>- श्री. सुतार ए. के. | : उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर अभियंता, नगर परिषद कार्यालय, लातूर<br>- श्री. चिद्रे डी. एस. | : उपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रमुख स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, लातूर<br>- श्री. राऊत एस. एस. | : उपस्थित |
| ३.५ | जन माहिती अधिकारी तथा<br>मालमत्ता व्यवस्थापक, नगर परिषद कार्यालय, लातूर<br>- श्री. कुटकर आर. एच. | : उपस्थित |
| ३.६ | जन माहिती अधिकारी तथा | : उपस्थित |

कर अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, लातूर
- श्री. मुतंगे ओ. एस.

| | | | |
|---|---|---|---|
| ३.७ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर - डॉ. धनंजय जावळीकर | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी तथा अग्निशमन अधिकारी, नगर अभियंता, प्रमुख स्वच्छता निरीक्षक, मालमत्ता व्यवस्थापक व कर अधीक्षक आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये एकूण ११ मुद्दयावर नगर परिषदेतील विविध सहा विभागातील विस्तृत अशी फार मोठ्या प्रमाणावर व्यापक माहिती मागितली आहे. त्याचा कालावधी नमूद केलेला नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणावर विस्तृत माहिती एकत्रित करण्याकरिता प्रत्येक विभागाची व पर्यायाने नगर परिषदेची साधनसामुग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती एका महिन्यात एकत्रित करुन देणे शक्य नाही, तरी माहिती संकलीत करण्याचा प्रयत्न केला आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती घेणार असे त्यांच्या अर्जात नमूद केले आहे. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १२-०४-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती फार मोठ्या प्रमाणावर व संदिग्ध असल्यामुळे त्यांना संचिका पहाणीसाठी उपलब्ध करुन द्याव्यात व त्यानंतर त्यांना अपेक्षित असलेली व जी माहिती अधिकार कक्षेत येते अशी माहिती सात दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी यास प्रतिसाद दिलेला नाही. दरम्यानच्या काळात जन माहिती अधिकारी, मालमत्ता विभाग यांनी त्यांच्याकडील एकत्रित करुन अपिलार्थीस पाठविलेली माहिती परत आलेली आहे. पाकिटावर पोस्टाचा परत असा शेरा लिहून पाकिट परत आले आहे. त्याचप्रमाणे आस्थापना शाखेची माहिती ही जी पोस्टाने पाठविली ती परत आली. अतः अपिलार्थीस खालीलप्रमाणे माहिती पाठविण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | नगर अभियंता, नगरपरिषद, लातूर | दिनांक १६-०६-२०१० पोस्टाव्दारे माहिती पाठविली |
| २ | अग्निशमन अधिकारी, नगरपरिषद, लातूर | दिनांक २५-०५-२०११ ----- "----- |

| | | |
|---|---|---|
| ३ | कर विभाग, नगरपरिषद, लातूर | दिनांक २६-०२-२०१० प्रत्यक्षात व्यक्तिशः दिली |
| ४ | आरोग्य विभाग, नगरपरिषद, लातूर | दिनांक २६-०७-२०११ ----- "----- |
| ५ | आस्थापना विभाग, नगरपरिषद, लातूर | पोस्टाने पाठविलेली माहिती परत आली आहे. |

आयोगापुढे केलेल्या युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात असली तरीही ती पुरविण्याचा प्रयत्न नगर परिषदेतील जन माहिती अधिकारी (सहा विभाग) यांनी केलेला दिसून येत आहे. मोठ्या प्रमाणावर विस्तृत व्याप्तीची माहिती मागविल्यास या अधिनियमातील उदिष्ट सफल होत नाही व माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरुन माहिती मागविण्यामागील गांभीर्य नष्ट होते. ही बाब आयोग नजरेस आणून देत आहे. अशा परिस्थितीत माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (९) नुसार माहिती देय होणार नाही. तथापि अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न झालेला आहे. केंद्रीय माहिती आयोगाने अशा प्रकारच्या माहिती अर्जावर माहिती देणे आवश्यक नाही असे प्रसंगी निर्णय घेतलेले आहे.

या सर्व बाबींचा विचार करता सदरचे प्रकरण या स्तरावर बंद करण्याच्या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पाटील यशवंत दत्तराव, संपादक, दै. मांजरा काठ, केशवनगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अग्निशमन अधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, : अपीलकर्ता
ॲड अंगद गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी,
नांदेड रोड, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,
लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर - श्री. बी. एम. लांब | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. अ. रा. सरोदे, उप अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-०३-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १७-०५-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०४-०१-२०१० च्या माहिती अर्जान्वये सन २००८ ते २००९ या दोन वर्षाच्या कालावधीतील एकूण तीन मुद्दयावर १५ पाझर तलावांची विस्तृत अशी हजेरीपट, मोजमाप पुस्तिका, मंजुरी आदेश, कार्यारंभ आदेश यांच्या छायांकीत प्रती इत्यादी माहिती मागितली आहे. त्याचप्रमाणे ही माहिती अपिलार्थीने त्यांनी दिलेल्या तक्त्यात मागितली आहे. या तक्त्यामध्ये माहिती तयार करुन देता येत नाही तसेच अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील नाहीत त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती-च्या छायांकीत प्रती पुरविण्याकरिता त्यांना रुपये ८६८८ इतक्या शुल्काचा भरणा करण्याकरिता दिनांक १२-०१-२०१० रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे कळविले. त्याचप्रमाणे कार्यालयात उपस्थित राहून कार्यालयीन वेळेमध्ये माहिती पाहू शकतात असेही कळविले. तथापि अपिलार्थी यांनी त्यास प्रतिसाद दिला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सादर केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक १७ मे २०१० रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी पैशाचा भरणा केल्यास तीस दिवसाच्या आत माहिती पुरवावी. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी प्रयत्न केलेले आहेत. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपील निकाली काढण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, ॲड अंगद गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नानासाहेब हणुमंत कांबळे, : अपीलकर्ता

व्दारा, गणेश दगडू होळे, रा.सुळ गल्ली, खडक हनुमान मंदिर, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर - श्री. सं. गो. मुनगिलवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने दिनांक १२-०४-२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये निलंगा तालुक्यात करण्यात आलेल्या ९० कामांची दिनांक ०१-०४-२००८ ते ०७-०४-२०१० या कालावधीतील प्रचंड अशी माहिती ज्यामध्ये मोजमाप पुस्तिकांची प्रत, अंदाजपत्रकाची प्रत, दिलेल्या बिलाची प्रत, तांत्रिक मंजूरी प्रत, वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीची प्रत इत्यादी माहिती मागितली आहे. ही माहिती एका महिन्यात देणे अशक्यप्राय आहे. तथापि दिनांक २९-०४-२०१० च्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा यांनी अपिलार्थीस माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे कार्यालयात उपस्थित राहून माहितीची पाहणी करावी व आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती आपणास देण्यात येतील असे कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कळविले आहे. तथापि अपिलार्थीने यास प्रतिसाद दिला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थीचा दिनांक १३-०५-२०१० रोजीचा अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक १७-०५-२०१० रोजी प्राप्त झाला. त्याची सुनावणी दिनांक १५-०६-२०१० रोजी व त्यानंतर दिनांक २२-०६-२०१० रोजी ठेवण्यात आली होती. तथापि अपिलार्थी यांनी कळविले की, त्यांनी व्दितीय अपील सादर केले असल्यामुळे ते प्रथम अपील सुनावणीला उपस्थित राहू शकत नाहीत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी ९० कामांची अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व माहिती अधिकार अधिनियम मधील कलम ७ (९) नुसार अशा माहितीचा अर्ज रद्द ठरविता येतो कारण अपिलार्थी यांनी विस्तृत व मोठ्या कालावधीची माहिती मागितल्यामुळे ही माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागणार आहे. तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी शक्य होईल तेवढी माहिती अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अपिलार्थीने त्यास प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे सदरचे व्दितीय अपील प्रकरण बंद करण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नानासाहेब हणुमंत कांबळे, व्दारा, गणेश दगडू होळे, रा.सुळ गल्ली, खडक हनुमान मंदिर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आंगद गुणवंतराव कांबळे, : अपीलकर्ता
मु. पो. तेलगांव, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तेलगांव,
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर,
जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०३८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आंगद गुणवंतराव कांबळे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तेलगांव, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. राऊत बी. आर. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. बिराजदार ए. एन. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी जानेवारी २००४ ते दिनांक १५-०३-२०१० पर्यंत सहा वर्षाच्या कालावधीची एकूण १६ विविध मुद्दयावर विस्तृत माहिती मागितली आहे व ही माहिती एका महिन्यात एकत्रित करणे अशक्यप्राय होते तथापि त्यांनी दिनांक १९-०५-२०१० रोजी अपिलार्थीस माहिती पाठविली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात त्यांना माहिती मिळाली आहे हे मान्य केले तथापि मुद्दा क्रमांक ३, ५, ६, ८, ११, १२ व १३ ची माहिती मिळाली नाही, असे आयोगास अवगत केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे या माहितीचा एक संच उपलब्ध आहे तो आयोगासमोर अपिलार्थीस देण्यात आला व अपिलार्थी यांनी तो स्विकारला.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आंगद गुणवंतराव कांबळे, मु. पो. तेलगांव, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तेलगांव, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,

अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हाणमंत भिमराव पाटील, : अपीलकर्ता
मु. पो. हंद्राळ, तालुका निलंगा, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हंद्राळ, तालुका निलंगा, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा,
जिल्हा लातूर

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०३९

२ सुनावणीची तारीख दि. ०४-०८-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हंद्राळ, तालुका निलंगा, जिल्हा लातूर - श्री. सावरगांवकर पी. एन.

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा,
जिल्हा लातूर - प्रतिनिधी - श्री. माने एस. एस., विस्तार अधिकारी (पं.)

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १३-०२-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०३-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः घेतली आहे व अपिलार्थीने दिनांक ०२-०५-२०११ रोजी दिलेल्या पोच पावतीची प्रत त्यांच्या दप्तरी आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळाली आहे व त्यांची कोणतीही तक्रार नाही असे अपिलार्थीने ग्रामसेवक, ग्रामपंचायत, हंद्राळ यांना दिनांक ०२-०८-२०११ च्या पत्राने कळविले आहे तसेच आयोगाकडील दिनांक ०४-०८-२०११ रोजीची सुनावणी रद्द करण्यात यावी असे कळविले आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हाणमंत भिमराव पाटील, मु. पो. हंद्राळ, तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हंद्राळ, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर, : अपीलकर्ता
मु. पो. गंगापूर, तालुका जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०४०
२ सुनावणीची तारीख दि. ०४-०८-२०११
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी - श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर ॲड गाडेकर सह : उपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर
- प्रतिनिधी - श्री. एन. पी. जावळीकर, विस्तार अधिकारी (उद्योग), पंचायत समिती, लातूर
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
- प्रतिनिधी - श्री. पाटील बी. एस., कक्ष अधिकारी

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-११-२००९
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --
६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. ०८-१२-२००९
७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १२-०१-२०१०
८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०४-२०१०

फेरसादर दिनांक
२६-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील ॲड.शंकर गाडेकर तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास विनंती केली की, अपिलार्थीच्या माहिती अर्जाची सद्यस्थिती अवगत करुन देण्यासाठी वेळ वाढवून मिळावा. ही विनंती मान्य करण्यात येत आहे व सुनावणीची तारीख पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोपाळ सदाशिव गाडेकर, मु. पो. गंगापूर, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अंकुश धोंडिबा पाटील, : अपीलकर्ता
रा. बोरोळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, सजा बोरोळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी, जिल्हा लातूर

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०४१
२ सुनावणीची तारीख दि. ०४-०८-२०११
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी : अनुपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित
तलाठी, सजा बोरोळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी, जिल्हा लातूर

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २५-११-२००९
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. २४-१२-२००९
६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. १७-०३-२०१०
७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --
८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे

ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०४-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंकुश धोंडिबा पाटील, रा. बोरोळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा बोरोळ, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, : अपिलार्थी
रा.नांदगाव,ता.चाकूर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, सजा शिवणखेड(बु), ता. चाकूर,जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी,
तहसील कार्यालय, चाकूर जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा.नांदगाव,पो. गांजूर,ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी,सजा शिवणखेड (बु) ता. चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, वडवळ(ना.), ता.चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश दगडू होळे, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव, उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अतिरिक्त सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.

२५.०३.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये त्यांच्या कार्यालयातील तळमजल्यावरील चेंबरची दुरुस्ती व नुतनीकरणाच्या केलेल्या कामाबाबत एकूण सात मुद्यांवर दि. ०१.०८.२००८ ते १ फेब्रुवारी, २००९ या कालावधीची माहिती मागितली आहे. यासंदर्भात एकूण ₹१२२/- चा भरणा करावा, असे कलम ७(१) नुसार विहित मुदतीत दि. १९.०४.२०१० रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी या पत्राची पोच जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे. पुढे जन माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. अपिलार्थी यांनी शुल्क भरल्यास जन माहिती अधिकारी यांनी तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय घेऊन अपील फेटाळले आहे. प्रथम अपिलाच्या निर्णयाची प्रत अपिलार्थीस देण्यात आली असून त्यांची पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी उपलब्ध आहे. अपिलार्थी यांनी आजपर्यंत प्रतिसाद दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी अशाचप्रकारचे एकूण सहा अर्ज याच कालावधीमध्ये केलेले आहेत. प्रत्येक प्रकरणामध्ये माहितीसाठीच्या शुल्काचा भरणा करावा, असे अपिलार्थीस कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती देण्याचा जन माहिती अधिकारी यांनी प्रामाणिक प्रयत्न केला असल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. याकरिता सदरचे द्वितीय अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश दगडू होळे,पोलीस रिपोर्टर लातूर, जिल्हा विशेष पोलीस प्रतिनिधी, सुळ गल्ली, खडक हनुमान मंदिर, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, : अपीलकर्ता
रा. उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, उदगीर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,उदगीर, जि.लातूर - श्री. सी.व्ही. तोंडारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, उदगीर, जि.लातूर - श्री. बी.एस.रणदिवे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,उदगीर, जि.लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.

२०.०२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मौ. वाढवणा बु.येथील शेततळयांच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात दि. ०६.०८.२००९ व २४.०८.२००९ रोजी दिलेल्या तक्रारी अर्जावर झालेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत मागितली आहे. उर्वरित माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे, जी देय होत नाही. यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) अन्वये चौकशी अहवालाच्या सद्यस्थितीबाबत दि. ०३.०२.२०१० रोजी अपिलार्थीस कळविण्यात आला आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०४.२०१० रोजी सुनावणी घेतली आहे. यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. चौकशी अहवाल प्राप्त होताच अपिलार्थीस माहिती तात्काळ विनामूल्य देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला होता. चौकशी अहवाल दि. १९.०५.२०१० रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविलेला आहे. त्यासंदर्भात अपिलार्थीने दि. २२.०५.२०१० रोजी पोच दिलेली आहे. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. त्यांना माहिती मिळाली आहे, असे त्यांच्या दि.०४.०८.२०११ रोजीच्या निवेदनावरुन दिसून येत आहे. तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दंड लावण्याची केलेली विनंती वरील बाबी विचारात घेता मान्य करण्यायोग्य नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव पारसेवार,गोविंदराज प्रिंटींग प्रेस, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख मुहम्मद खुर्रम अ. रशिदसाब, : अपीलकर्ता
रा.निलंगा, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख मुहम्मद खुर्रम अ. रशिदसाब | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही. तसेच त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय मिळालेला नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर सुनावणीच्यावेळी ते तोडगा काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०४.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.२८.०४.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुहम्मद खुर्रम अ.रशिदसाब, छोटी मस्जिीदजवळ, निलंगा, ता. निलंगा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अनुरथ तात्याराव चांदमारे,<br>रा.लातूर. | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>उपविभाग,अंबाजोगाई, जि.बीड<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>अंबाजोगाई, जि.बीड | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई,जि.बीड - श्री. पी.एम.कानडखेडकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई,जि.बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई, जि.बीड यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीकरिता ₹३००/- एवढया शुल्काचा भरणा कार्यालयात करावा, असे कलम ७(१) अन्वये विहित मुदतीत दि. ०६.०१.२०१० रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि.०९.०४.२०१० रोजी अपिलार्थीस मोफत माहिती द्यावी, असा निर्णय घेतला आहे. त्यानुसार अपिलार्थीस दि. १०.०४.२०१० रोजी पोस्टाद्वारे माहिती पाठविली आहे. ती अपिलार्थीस मिळालेली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीस विहित मुदतीत शुल्काचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केलेला नाही. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली व अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावी, असा निर्णय घेतला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करणेबाबत विहित मुदतीत कळविले होते. त्या शुल्काचा अपिलार्थीने भरणा केला किंवा नाही. याबाबीची जन अपिलीय अधिकारी यांनी नोंद घेणे आवश्यक होते. भविष्यात त्यांनी याबाबतची दक्षता घ्यावी. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनुरथ तात्याराव चांदमारे,नेताजीनगर, कैलासनगरच्या बाजूला, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संगमे सचिन चंद्रकांत,<br>रा.उदगीर, जि.लातूर. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | उत्तरवादी |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०४७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,लातूर विभाग,लातूर - श्री. शेख नजीरोद्दीन | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या दोन अर्जाच्या प्रती कार्यालयात शोध घेऊनही उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यात आली नाही. माहितीच्या कालावधी इ.स.२००२ असा आहे. या कालावधीत विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय हे औरंगाबाद येथे होते. २००३ मध्ये संबंधित कार्यालयाचे विभाजन होऊन लातूर विभागीय कार्यालयाची निर्मिती झालेली आहे. त्यामुळे या संचिकेचा शोध घेऊनही ती सापडली नाही. याकरिता आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचे एक पथक तयार करुन औरंगाबाद व लातूर कार्यालयात संचिकेचा शोध घ्यावा व माहिती प्राप्त होताच अपिलार्थीस विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सदरची माहिती अन्य कार्यालयात उपलब्ध होत असल्यास त्या कार्यालयाचा पत्ता अपिलार्थीस कळविण्यात यावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संचिकेचा शोध घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याची कार्यवाही दोन महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संगमे सचिन चंद्रकांत,संगमे निवास, नोबल कॉलनी, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. व्ही. एस.आकणगिरे, : अपीलकर्ता
रा.रेणापूर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण संचालनालय,
म.रा.,पुणे.
जन अपिलीय अधिकारी,
प्राथमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. व्ही. एस.आकणगिरे, तालुका अध्यक्ष,अखिल भारतीय सेना, रेणापुर, ता.रेणापुर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण संचालनालय, म.रा.,डॉ. ॲनी बेझंट रोड, मध्यवर्ती इमारत,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, प्राथमिक शिक्षण संचालनालय, म.रा,डॉ. ॲनी बेझंट रोड, मध्यवर्ती इमारत,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नागरगोजे बळीराम सोपान, : अपीलकर्ता
रा.रामवाडी, ता.चाकूर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
परिमंडळ वन अधिकारी, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय वन अधिकारी,उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - १) वन परिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर, जि. उस्मानाबाद - श्री. ए.जी.पाटील २) वन परिक्षेत्र अधिकारी, अहमदपूर, जि.लातूर - श्री. आर.जी.मुद्दमवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय वन अधिकारी,उस्मानाबाद- प्रतिनिधी - श्री. आर.एम. जोशी, लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी क्र.१ व २, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,तुळजापूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अहमदपूर तालुक्याशी संबंधित असल्यामुळे सदरचा अर्ज अधिनियमातील कलम ६(३)(एक)नुसार जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, अहमदपूर यांच्याकडे हस्तांतरित केला. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, अहमदपूर यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी चाकूर तालुक्यातील सन २००२ ते ८ या सहा वर्षांच्या कालावधीतील गहू व तांदूळ कुपनाचे किती वाटप केले, किती शिल्लक आहेत, कामाचे अंदाजपत्रकांचा तपशील, हजेरीपत्रके इ.विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. त्यामुळे या माहितीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपिलार्थीने पाहणी करावी, असे दि. १८.०२.२००९ रोजी कलम ७(१) अन्वये विहित मुदतीत कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ३०.११.२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत माहिती पुरवावी, असा निर्णय दिला. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. त्यानुसार अपिलार्थीस दि. ११.१२.२००९ व १५.१२.२००९ रोजी माहिती विनामूल्य देण्यात आली आहे. अपिलार्थी यांची यासंदर्भात दि. १५.१२.२००९ रोजीची पोच त्यांच्या दप्तरी उपलब्ध आहे.

या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे व त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे दिसून येत आहे

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागरगोजे बळीराम सोपान,रा.रामवाडी, पो. महाळंगी,ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, अहमदपूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोमण गोंविदराव निडवदे,रा लातूर : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी,
ल.पा.(स्था.स्तर) उपविभाग, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर)विभाग,
जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३१० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, ल.पा.(स्था.स्तर) उपविभाग, परभणी- श्री. ब्रम्हप्रकाश ठाकूर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०६.०९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०४.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०३.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग, जायकवाडी वसाहत,परभणी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी या पदाचा कार्यभार नुकताच स्वीकारलेला आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर सुनावणीच्यावेळी ते तोडगा काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर)विभाग, जालना यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, जालना यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोमण गोविंदराव निडवदे,तुलसी निवास, शाहुपुरी कॉलनी, राजीव गांधी

चौक,मु.पो.ता.जि.लातूर - ४१३ ५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,लघुपाटबंधारे(स्था.स्तर), उपविभाग,जायकवाडी वसाहत, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग, : अपीलकर्ता
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,उदगीर,
जि.लातूर.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९ /रामाआ/अपील/सिआर/२३११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - लेखा परिक्षक, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर - श्री. व्ही. के. अंबेसंगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर - श्री. एस.टी.चव्हाण | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०४.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.०८.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते.

त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग,रा.दबीरपुरा,उदगीर, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा लेखा परिक्षक, नगर परिषद,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामचंद्र निवृत्ती बिरादार, : अपिलार्थी
रा.बेलसकरगा, ता.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय,
लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामचंद्र निवृत्ती बिरादार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधीक्षक (गृह), लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, लातूर - प्रतिनिधी - श्री. पी.व्ही.नवसारे, उपअधिक्षक, लातूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली प्रश्नार्थक, खुलासेवजा, स्पष्टीकरणात्मक

माहिती अपिलार्थीस देय होणार नाही. त्याचप्रमाणे कलम ८(१) च्या तरतुदीनुसार जी माहिती देय आहे, त्यासंदर्भात प्रथम अपिलावर निर्णय घ्यावा लागेल. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२८.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामचंद्र निवृत्ती बिरादार,रा.बेलसकरगा, ता.उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, : अपिलार्थी
रा.टेंभुर्णी, ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस अधीक्षक, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०६१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधीक्षक (गृह), लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, लातूर - प्रतिनिधी - श्री. पी. व्ही. नवसारे, पो.उपअधीक्षक, लातूर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन,अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय घेतल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी

असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.०७.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, मु. टेंभुर्णी पो. ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किशन दादाराव तरटे, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअधीक्षक (मुख्यालय),
पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. किशन दादाराव तरटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधीक्षक (गृह), लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, लातूर - प्रतिनिधी - श्री. पी.व्ही. नवसारे, उपअधीक्षक, लातूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, ते दिल्ली पोलीसचे कर्मचारी आहेत. त्यांनी व्यक्तिगत कामासाठी माहिती मागितलेली आहे. त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतलेली नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २०.०६.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२०.०६.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशन दादाराव तरटे, संभाजी सोसायटी,कानमंदे यांच्या बाजूला, देगलूर रोड, उदगीर, जि.लातूर - ४१३ ५१७.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र सत्यनारायणजी गिल्डा, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर रचनाकार, नगर रचना विभाग,
नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर रचनाकार, नगर रचना विभाग,नगर परिषद, लातूर - श्री. सतिश शिवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर रचना विभाग,नगर परिषद, लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये एकूण सहा मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी ५ मुद्यांवर माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १६.०७.२०१० रोजी दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०९.०८.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, प्रश्नार्थक बाबींची माहिती देण्याची माहिती अधिकार कायद्यामध्ये तरतुद नाही. तरीसुध्दा मुद्दा क्र. ५ बाबत जन माहिती अधिकारी यांनी वसूली विभाग व मालमत्ता विभागास पत्र देवून या जागेबाबत नोंद असल्यास ती माहिती उपलब्ध करुन अपिलार्थीस ७ दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी. त्यानुसार दि. ०४.०८.२०११ रोजी अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी या बाबतची पोच जन माहिती अधिकारी यांना दिली असून त्यांची तक्रार राहिली नसल्याचे नमूद केले आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र सत्यनारायणजी गिल्डा, 'कृष्णा', बालाजी मंदिरसमोर, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर रचना विभाग,नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश व्यंकटराव बुलबुले, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
बांधकाम विभाग, नगर परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुरेश व्यंकटराव बुलबुले | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर रचनाकार,नगर परिषद, लातूर - श्री. सतिश शिवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ३०.०३.२०१० रोजीच्या मूळ अर्जाद्वारे सन १९८० ते २०१० पर्यंतची शॉपींग कॉम्प्लेक्सच्या

बांधकामाबाबतची तसेच इतर बांधकामाबाबतची विविध मुद्यांवर विस्तृत अशी माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे मागितली आहे. सदरची माहिती विस्तृत स्वरुपात असल्यामुळे आणि त्यांच्या सुमारे दहा संचिका असल्यामुळे शुल्क भरण्याकरिता दि. ३१.०३.२०१० रोजी कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद,लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २४.०६.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. यानंतर अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगास दिसून येत नाही. अपिलार्थी यांना विशेषतः बी.ओ.टी. तत्त्वावरील कामांची माहिती आवश्यक आहे, असे सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आढळून आले. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप व कालावधी विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार दोन दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी दोन दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश व्यंकटराव बुलबुले,२३/७२, कापड लाईन, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार,नगर परिषद, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख सादिक पिता खाजामियॉं, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०६५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी श्री. शेख सादिक पिता खाजामियॉं व त्यांचे वकील ॲड. एस.ए.पी.कादरी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील ॲड. एस.ए.पी.कादरी उपस्थित आहेत. संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख सादिक पिता खाजामियॉ, रा.राज महम्मद दर्गा रोड,उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बस्वराज भिमराव कपाळे, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, उदगीर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक, भूमी अभिलेख, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बस्वराज भिमराव कपाळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधिक्षक,भूमी अभिलेख, उदगीर,जि.लातूर - श्री. डी. व्ही. सर्जे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक,भूमी अभिलेख,लातूर -प्रतिनिधी - श्री. एल. ए.झुंजारे,शिरस्तेदार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक,भूमी अभिलेख, उदगीर,जि.लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.

२२.०६.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे स.नं.१७४ व १७५ या शेतजमिनीच्या मोजणीसंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. यासंदर्भात अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीच्या वेळी त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात त्यांना माहिती मिळाल्याचे मान्य केले. तथापि त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे, असे सांगितले. अपूर्ण माहितीबाबत आयोगाने विचारणा केली असता अपिलार्थीने त्यांना खालील मुद्यांसंदर्भात माहिती मिळाली नाही, असा युक्तिवाद केला.

१) साधारण/सत्वर/अतिसत्वर मोजणी करण्यासाठी शुल्क भरल्यानंतर जमीन मोजण्यासाठी लागणारा कालावधी किती असतो, यासंदर्भातील माहिती.

२) महाराष्ट्र महसूल जमीन अधिनियम १९६६ मधील कलम ८५(२) अन्वये आदेश व त्यासंदर्भातील पुढील कार्यवाही, या संदर्भातील माहिती.

३) जमिनीची मोजणी व त्यासंदर्भातील पंचनामा करताना अधिकारी/कर्मचारी यांनी करावयाच्या कार्यवाहीची माहिती.

ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. एक विशेष बाब म्हणून अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल. यास्तव आयोगाचे अभिप्राय असे आहेत की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात यासंदर्भात उपलब्ध झालेले शासन निर्णय/परिपत्रके/वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झालेले मार्गदर्शन इत्यादीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये मान्य केली.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय होत असलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रांच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बस्वराज भिमराव कपाळे,रा. कपाळे गल्ली,रोकडे हनुमान रोड, महादेव मंदिराजवळ, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक,भूमी अभिलेख, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संजीवकुमार पंढरी गायकवाड,<br>रा.जोगाळा, ता.शिरुर अनंतपाळ,<br>जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्यादित,उदगीर, जि.लातूर<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्यादित,उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित,उदगीर,<br>जि.लातूर- श्री. एन.आर.देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित,उदगीर,<br>जि.लातूर- श्री. बी.बी.देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९.०९.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०८.१०.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १३.०९.२०१० रोजीच्या अर्जाद्वारे नळेगाव शाखेअंतर्गत नवीन वीज जोडणीबाबतची ४ मुद्यांवर माहिती मागितली आहे. तथापि हा अर्ज परिपूर्ण नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०९.२०१० रोजीच्या पत्रान्वये निकाली काढला आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०९.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, प्रथम अपील अर्ज परिपूर्ण सादर केलेला नसल्यामुळे विचार करता येत नाही, असे नमूद करुन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले आहे. अपिलार्थीचे द्वितीय अपील दि. ०६.१०.२०१० रोजीचे आहे. या द्वितीय अपिलास कोर्ट-फी-स्टॅम्प जोडलेला नाही. अपिलार्थी यांनी माहितीकरिता अर्ज व अपील अर्ज अपूर्ण सादर केलेला दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजीवकुमार पंढरी गायकवाड, रा. जोगाळा, पो. लक्कडजवळगा, ता. शिरुर (अ) जि.लातूर - ४१३ ५४४.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आंगद गुणवंतराव कांबळे, : अपिलार्थी
रा.तेलगाव, ता.अहमदपूर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
व्यवस्थापक,महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा चापोली,
ता.चाकूर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष, महाराष्ट्र ग्रामीण बँक, मुख्य कार्यालय,नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | अध्यक्ष,महाराष्ट्र ग्रामीण बँक, मुख्य कार्यालय,नांदेड - प्रतिनिधी - श्री. उदय कि.कुर्वलकर, क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, विभागीय कार्यालय,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अध्यक्ष व सरव्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, नांदेडतर्फे श्री. उदय कि.कुर्वलकर, क्षेत्रीय व्यवस्थापक,औरंगाबाद उपस्थित आहेत.

आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, महाराष्ट्र ग्रामीण बँकेची निर्मिती रिजनल रुरल बँक ॲक्ट,१९७६ (दि.०९.०२.१९७६) नुसार झाली आहे. या बँकेमध्ये ५०% सहभाग केंद्र सरकारचा असून ५०% सरकारच्या इतर उपक्रमांचा - बँक ऑफ महाराष्ट्रचा ३५% व राज्य शासनाचा १५% सहभाग आहे. या पार्श्वभूमीवर बँकेस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होतो. बँक केंद्रीय कायद्याखाली निर्माण झाली असल्यामुळे या प्रकरणाशी संबंधित द्वितीय अपील केंद्रीय माहिती आयोगाकडे करावे लागेल. अपिलार्थी यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.०९.२०१० रोजी केलेले आहे. प्रस्तुत अपिलावर विचार करणे राज्य माहिती आयोगाच्या अधिकारकक्षेच्या बाहेर आहे. अपिलार्थी यांना आवश्यक वाटल्यास केंद्रीय आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०८-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आंगद गुणवंतराव कांबळे,रा.तेलगाव, ता.अहमदपूर,जि.लातूर

२. सरव्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक,केंद्रीय कार्यालय,शिवाजीनगर, नांदेड -४३१६०२

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दुधाटे एस.एस.,रा.अहमदपूर,जि.लातूर : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपसंचालक (शिक्षण),
समाजकल्याण संचालनालय,म.रा.पुणे.
जन अपिलीय अधिकारी तथा
सहसंचालक (शिक्षण),
समाजकल्याण संचालनालय,म.रा.पुणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहाय्यक संचालक (शिक्षण) समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे - श्रीमती एस.एस.इथापे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहसंचालक (शिक्षण), समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे -प्रतिनिधी - श्री. एस.एस.शिंदे, विशेष अधिकारी (भारत सरकार शिष्यवृत्ती), समाजकल्याण, म.रा.पुणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०८.२०१० (पुणे कार्यालयाला प्राप्त) |

दि. ३१.०८.२०१०
(औरंगाबाद कार्यालयाला प्राप्त)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (शिक्षण), समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १३.०४.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये एकूण ६ मुद्यांवर विस्तृत माहिती मागितली आहे. ही माहिती प्रचंड प्रमाणावर असल्यामुळे एकत्रित करुन एक महिन्याच्या आत उपलब्ध करुन देणे शक्य नव्हते.म्हणून ही माहिती त्यांच्या कार्यालयात पाहण्याकरिता अधिनियमातील कलम ७(९) नुसार त्यांच्याकडील दि. २८.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविण्यात आले. अपिलार्थी यांनी त्यास प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ०२.०७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे सुनावणी झाली, त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व या सुनावणीनंतर सहसंचालक (शिक्षण),समाजकल्याण संचालनालय, म.रा.पुणे यांनी दि.०७.०७.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याप्रमाणे एकूण १४०२ पृष्ठांची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस दि. १४.१०.२०१० रोजी विनामूल्य पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी उपलब्ध आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी मोठया प्रमाणावर माहिती मागितली असली तरीही ती एकत्रित करुन अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दुधाटे एस.एस.,रा.महात्मा फुले कॉलनी,अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (शिक्षण) समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (शिक्षण), समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री.मोहमद शुकुर इस्माईल बागवान,<br>रा. भोकरंबा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर - श्री. एम. एम. आनंदा | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८        राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख        दि.  ०१-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मौजे भोकरंबा, तालुका रेणापूर येथील गट क्रमांक २४३ मधील बेकायदेशीर झाड तोडल्याबाबतची एकूण चार मुद्दयावर माहिती मागितली आहे.  यापैकी अपिलार्थीस एका मुद्दयाची माहिती देण्यात आली आहे.  मुद्दा क्रमांक १ व २ या दोन मुद्दयांची माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.  त्याचप्रमाणे मुद्दा क्रमांक ४ ची माहिती संबंधित तलाठी / मंडळ अधिकारी यांच्याकडून घेण्यात यावी असे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत.  त्यांना एका मुद्याची माहिती मिळाली आहे.  दोन मुद्दयांची माहिती मिळाली नाही.  आयोगातर्फे सूचित करण्यात येते की, या माहितीचा पुन्हा शोध घ्यावा तसेच तलाठी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्याची व्यवस्था करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद**        **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक   ०५-०८-२०११**        **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.   श्री.मोहमद शुकुर इस्माईल बागवान, रा. भोकरंबा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर.

२.   जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.   जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी

कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बळवंत निवृत्ती घोगरे, : अपिलार्थी
मु. पो. हेर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बळवंत निवृत्ती घोगरे श्री. हुडगे बंडू रुद्रप्पा, मदतनीस यांचेसह | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (म-१), तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर - श्री. येरमे गोविंद हरिश्चंद्र | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे मदतनीस व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मौजे हेर येथील सर्व्हे नंबर २११ वरील सन १९५२ ते १९६० या दरम्यान गावठाण विस्तारा-साठी वाटप झालेले प्लॉट यांची यादी व संचिका मागितली आहे. ही संचिका जुनी असून व शोध घेऊनही ती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सूचित केले की, त्यांनी काही संदर्भ दिल्यास संचिकेचा शोध घेणे शक्य होईल.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, सर्व्हे नंबर २११ मध्ये २३६ प्लॉट आहेत. यासंबंधी त्यांना माहिती आवश्यक आहे. यापूर्वी जन माहिती अधिकारी कार्यालयाकडे अर्ज सादर केले आहे. तथापि त्यांना माहिती प्राप्त होऊ शकली नाही. यावर आयोगाने असे सांगितले की, सर्व्हे नंबर २११ मध्ये जे प्लॉटधारक आहेत त्यांची यादी अपिलार्थीस देण्यात यावी म्हणजे त्या यादीवरुन पुढे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती या यादीचा वापर करुन ते मागवू शकतील. दोन्ही बाजूंना ही बाब मान्य झाली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बळवंत निवृत्ती घोगरे, मु. पो. हेर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-१), तहसील कार्यालय, उदगीर,

तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आर. आर. विहिरे, : अपिलार्थी
महाराष्ट्र हाऊसिंग सोसायटी, बार्शी रोड, पाण्याच्या टाकीशेजारी, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून, नपाप्र, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा प्रकल्प अधिकारी, नपाप्र, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर - श्रीमती नंदा यादवराव गायकवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये एकूण तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. यातील त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली मुद्दा क्रमांक दोनची माहिती दिनांक ०१-०४-२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. मुद्दा क्रमांक एक मधील जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेतलेल्या बैठकीचे ठराव / इतिवृत्त शोध घेऊनही सापडले नाहीत व त्यामुळे हि माहिती देता येत नाही असे अपिलार्थीस दिनांक १२-०७-२०१० रोजी कळविण्यात आले आहे. मुद्दा क्रमांक तीनची माहिती नगर परिषद कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस सदर माहिती पुरवावी असे दिनांक २७-०४-२०१० कळविण्यात आले होते व त्यानुसार दिनांक १०-०६-२०१० रोजी नगरपरिषद कार्यालयाने अपिलार्थीस माहिती पाठविली आहे.

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थी यांना उपलब्ध झालेली माहिती देण्यात आली आहे असे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आर. आर. विहिरे, महाराष्ट्र हाऊसिंग सोसायटी, बार्शी रोड, पाण्याच्या टाकी शेजारी, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, नपाप्र, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नपाप्र, जिल्हाधिकारी

कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विलास श्रीनिवासराव पाटील,<br>रा. नदीहत्तरगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर,<br>ह. मु. आडत लाईनच्या उत्तरेस, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, निलंगा,<br>तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, निलंगा,<br>तालुका निलंगा, जिल्हा लातूर - श्री. सौदागर तांदळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, निलंगा, तालुका निलंगा,<br>जिल्हा लातूर - श्री. दिपक आकडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २४-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०७-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये एकूण तीन त्रयस्थांना भूकंप पुनर्वसन यादीतील १३ सप्टेबर १९९४ च्या शासन निर्णयानुसार घर वाटप करण्याच्या नियमातील आठ अ व जनगणनेच्या दिलेल्या नंबरची यादी मागितली आहे. ही माहिती १९९३-९४ सालची आहे. शोध घेऊनही सदर माहिती सापडली नाही ही बाब अपिलार्थीस दिनांक १८-०९-२०१० रोजी कळविण्यात आली आहे व अर्ज निकाली काढला आहे. तथापि तरीही अर्जदाराची माहितीची निकड विचारात घेता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सदर माहितीचा शोध घेण्यात आला व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांची दिनांक २९-१०-२०१० रोजीची पोच जन माहिती अधिकारी यांच्याकडे आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागपत्रावरुन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सकारात्मक भूमिका घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयातून माहिती घेऊन अपिलार्थीस दिलेली आहे ही बाब उल्लेखनीय आहे याची नोंद जिल्हाधिकारी, लातूर यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास श्रीनिवासराव पाटील, रा. नदीहत्तरगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर, ह. मु. आडत लाईनच्या उत्तरेस, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नारायण भगवान गोसावी, : अपिलार्थी
व्दारा, विनायक दामोधर सवारकर सहकारी पतसंस्था,
उषाकिरण कॉम्प्लेक्स, बार्शी रोड, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मुरुड,
तालुका जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०५४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मुरुड, तालुका जिल्हा लातूर - श्री. पवार के. डी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर - प्रतिनिधी - श्री. एन. पी. जावळीकर, विस्तार अधिकारी (उद्योग), पंचायत समिती | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५-०७-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २२-१०-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण भगवान गोसावी, व्दारा, विनायक दामोधर सवारकर सहकारी पतसंस्था, उषाकिरण कॉम्प्लेक्स, बार्शी रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मुरुड, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. श्रीमंत रामभाऊ शिंदे,<br>श्री. सुनिल बळीराम शिंदे, शिंदे गल्ली, रेणापूर,<br>जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, रेणापूर,<br>जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर,<br>जिल्हा लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीमंत रामभाऊ शिंदे व श्री. सुनिल बळीराम शिंदे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, रेणापूर,<br>जिल्हा लातूर - श्री. माने एम. पी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर,<br>जिल्हा लातूर - श्री. व्ही. जी. लोखंडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०५-०८-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-०९-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोनही अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आलेली नाही. अपिलार्थी यांनी त्रयस्थांची माहिती मागितली आहे. जन अपिलीय अधिकारी यांना सुनावणी घ्यावी लागेल. नैसर्गिक न्याय व पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ नुसार त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यावी लागेल .तसेच ही माहीती देणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरते किंवा कसे हि बाब तपासून निर्णय घ्यावा लागेल.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर, जिल्हा लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०५-०८-२०११**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीमंत रामभाऊ शिंदे, शिंदे गल्ली, रेणापूर, जिल्हा लातूर

२. श्री. सुनिल बळीराम शिंदे, शिंदे गल्ली, रेणापूर, जिल्हा लातूर

३. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जोरे इसूफ फतरुसाब, : अपिलार्थी
मु. टाकळी, पो. वलांडी, तालुका देवणी, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, राष्ट्रीय विद्यालय, टाकळी, तालुका देवणी, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०५६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जोरे इसूफ फतरुसाब | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, राष्ट्रीय विद्यालय, टाकळी, तालुका देवणी, जिल्हा लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०४-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १३-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेण्यात आली. त्यांनी मुख्याध्यापक, राष्ट्रीय विद्यालय, टाकळी, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांच्या सबंधीचे त्यांच्या स्वतःच्या जात प्रमाणपत्राची प्रत मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राष्ट्रीय विद्यालय, टाकळी, तालुका देवणी, जिल्हा लातूर हे स्वतःच या प्रकरणात त्रयस्थ म्हणून आहेत. त्यांनी त्यांचे प्रमाणपत्र गहाळ झाले व अपिलार्थीस देता येत नाही असे कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आढळून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी हे स्वतः या माहिती अर्जाच्या संबंधात त्रयस्थ आहेत ही बाब विचारात घेतल्याचे आढळून येत नाही. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी या प्रकरणाची पुन्हा सुनावणी घ्यावी व मुख्याध्यापक व अपिलार्थी उपस्थित राहतील असे पहावे. त्याचप्रमाणे जातीच्या प्रमाणपत्राची प्रत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी लागेल. जन माहिती अधिकारी यांचेकडे ही माहिती उपलब्ध नसल्यास त्याची एक प्रत जिल्हा परिषद, लातूर कडे उपलब्ध असणे शक्य असल्यामुळे तेथून प्राप्त करुन अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत पुन्हा सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जोरे इसूफ फतरुसाब, मु. टाकळी, पो. वलांडी, तालुका देवणी, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राष्ट्रीय विद्यालय, टाकळी, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मानसिंग पोमा पवार, : अपिलार्थी
रा. सोमनाथपूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपूर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर,
जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मानसिंग पोमा पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपूर,<br>तालुका उदगीर, जिल्हा लातूर - श्री. राठोड एस. एच. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उदगीर,<br>जिल्हा लातूर - श्री. केंद्रे यु. एम. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २७-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी दिनांक २१-०६-२०१० च्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत सोमनाथपूर मधील एकूण सहा मुद्दयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. या माहितीच्या छायांकीत प्रती देण्याकरिता रुपये २३१० इतक्या शुल्काचा भरणा करावा म्हणजे माहितीच्या झेरॉक्स देता येतील असे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०६-२०१० रोजी अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांनी त्यास प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते असे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असा निर्णय दिला आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती देण्याचा जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केलेला आहे तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही. अपिलार्थीस ही माहिती आवश्यक असेल तर त्यांनी त्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले शुल्क भरुन माहिती घेऊन जावी. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाच्या स्तरावर प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मानसिंग पोमा पवार, रा. सोमनाथपूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. देविदास रामराव गायकवाड,<br>श्री मावूली, दत्तमंदिर मागे, जुना औसा रोड, ड्रायव्हर कॉलनी, लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. देविदास रामराव गायकवाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. बोडखे एन. डी., प्रशासन अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. पाटील बी. एस., कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलावर दिनांक ०७-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. त्यांनी माहिती मिळाली नसल्याचे सुनावणीमध्ये सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, अपिलार्थीस दिनांक २८-०४-२०१० च्या पत्रासोबत माहिती देण्यात आली आहे तसेच या माहितीची प्रत प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी पुन्हा अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली असल्याने व सुनावणीच्या वेळीही या माहितीची प्रत दिली असल्याने जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रावरून ही बाब दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास रामराव गायकवाड, श्री मावूली, दत्तमंदिर मागे, जुना औसा रोड, ड्रायव्हर कॉलनी, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शिंदे किशन व्यंकटराव,<br>रा. अंबुलगा बु., तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, अंबुलगा बु., तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अंबुलगा बु., तालुका निलंगा, जिल्हा लातूर - श्री. धावारे एम. एन. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर - श्री. शिंदे के. बी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३-०७-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ३०-०४-२०१० च्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१ एप्रिल २००९ ते ३०-०४-२०१० पर्यंतची आंबुलगा (बु.), तालुका निलंगा या ग्रामपंचायतची विविध विषयावर विस्तृत माहिती मागितली आहे. या माहितीकरिता रुपये १५ इतक्या शुल्काचा भरणा करावा असे दिनांक १०-०५-२०१० रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत अपिलार्थीस कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केला नाही म्हणून अपिलार्थीस दिनांक २८-०५-२०१० रोजी पोस्टाने माहिती विनामूल्य पाठविण्यात आली आहे. त्यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा यांनी दिनांक १३-०७-२०१० रोजी अपिलार्थीस परिपूर्ण माहिती देण्यात यावी असा निर्णय दिला आहे. सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते.

व्दितीय अपिलामध्ये अपिलार्थीने खर्चाचा तपशील मोघमपणे मागितला आहे. त्याबाबत नेमका खर्चाचा तपशील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना कळवावा लागेल. तथापि त्यांना दिलेल्या माहितीमध्ये बाबनिहाय खर्च दिलेला आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. याकरिता ग्रामपंचायतकडे उपलब्ध निधीमधून किती बाकी आहे ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस उर्वरीत माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिंदे किशन व्यंकटराव, रा. अंबुलगा बु., तालुका निलंगा, जिल्हा लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अंबुलगा बु., तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे,<br>रा.उदगीर, जि.लातूर | : अपिलार्थी |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>आगार प्रमुख (क),राज्य परिवहन<br>महामंडळ,उदगीर,जि.लातूर | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,<br>विभागीय कार्यालय,लातूर | : |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८९४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, उदगीर, जि.लातूर - श्री.शिवाजी प्रल्हादराव देशमुख | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर- श्री. दयानंद मसाजी गायकवाड | : उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री.के.ए.शेख, श्री.एम.पी.मरे, श्री.ए.एम.शिंदे, श्री.एन.एम.बिरादार,श्री.ए.के.डोळे सर्व वाहक | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २८.८.२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३०.११.२००९ (मुंबई कार्यालयाकडे प्राप्त)<br>०२.०१.२०१० (औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष (९ पैकी ५ वाहक) उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास त्यांच्या युक्तिवादात अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २५.०७.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये सन २००१ ते ०७ या विस्तृत कालावधीत उदगीर राज्य परिवहन आगार, उदगीर,जि.लातूर संदर्भात पंधरा मुद्यांवर माहिती मागितली आहे. सदरची माहिती इतर ९ त्रयस्थ वाहनचालक व वाहकांच्या संदर्भातील आहे. अपिलार्थी यांनी अशाप्रकारची मोठया कालावधीची व विस्तृत माहिती मागितल्याने ती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला. तदनंतर दि.०९.०९.२००९ रोजी संपूर्ण माहिती (एकूण १०१ पृष्ठांची) अपिलार्थीस देण्यात आली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात आली. त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहे. त्यांच्या दि. १८.११.२००९ रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे की, त्यांना माहिती मिळाली आहे. तथापि या माहितीमध्ये काही मुद्यांची माहिती अपूरी व खोटी आहे, असे मोघम नमूद केले आहे. नेमकी खोटी व अपुरी माहिती कोणती, हे अपिलार्थी यांनी नमूद केलेले नाही.

आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवादावरुन अपिलार्थीस माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, शिवगण निवास सत्ताने निवाससमोर,बिदर रोड,मु.पो.ता.उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गायकवाड बंकट गंगाधर,<br>रा.उदगीर,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.लातूर - प्रतिनिधी - श्री.दयानंद नागनाथ स्वामी,अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०३.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०३.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गायकवाड बंकट गंगाधर, पंचायत समितीच्या गोदामाजवळ,अशोकनगर, उदगीर,ता.उदगीर,जि.लातूर - ४१३ ५१७.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बालाजी विश्वनाथ बिरादार,<br>रा.चवणहिप्परगा, ता.देवणी, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,पंचायत समिती, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बालाजी विश्वनाथ बिरादार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत चवणहिप्परगा, ता.देवणी, जि.लातूर - श्री. आर.आर.बिराजदार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि.लातूर - श्री. दाताळ नितीन शेषराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. २१.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष जालनाथबाबा मठाच्या जागेसंदर्भात नमुना नं. ८ ची प्रत व इतर दोन मुद्यांद्वारे प्रश्नार्थक स्वरुपामध्ये खुलासेवजा व स्पष्टीकरणात्मक माहिती मागितली आहे. माहिती या व्याख्येत सदरची बाब मोडत नाही. त्यामुळे माहिती देय होत नाही. तथापि जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत चवणहिप्परगा, ता.देवणी, जि.लातूर यांनी अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांना कोणती माहिती अभिप्रेत आहे, हे विचारात घेऊन दि. २७.०१.२०१० रोजी माहिती दिली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य केली आहे. तथापि त्यांना माहिती उशिरो मिळाली आहे, असे त्यांनी आयोगास सांगितले.

अपिलार्थी यांची प्रश्नार्थक स्वरुपाचा अर्ज त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना माहिती उशिरा मिळाली, ही बाब विचारात घेणे आयोगास आवश्यक वाटत नाही.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी विश्वनाथ बिरादार,रा.मौजे चवणहिप्परगा,ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत चवणहिप्परगा, ता.देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देविदास रामराव गायकवाड, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. देविदास रामराव गायकवाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकुन, जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर - श्री. एस.आर.सुर्यवंशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - धान्य खरेदी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या स्वत:च्या जमिनीबाबत एकूण सहा मुद्यांवर माहिती मागितली आहे. सदरची माहिती

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब युक्तिवादात सुनावणीच्या वेळी मान्य केली आहे. तथापि त्यांना मुद्दा क्र. ४,५,६ या मुद्यावरील माहिती मिळाली आहे. परंतु मुद्दा क्र. १,२,३ ची माहिती मिळाली नाही, असे युक्तिवादात सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. १,२,३ ची माहिती अपिलार्थीस दिल्याचे समर्थनार्थ पुरावा सादर करु शकले नाही. यास्तव सदरची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल. निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांना ही बाब विशेष बाब म्हणून पहावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांनी एक विशेष बाब म्हणून अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ३ ची माहिती जन माहिती अधिकारी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवतील, असे व्यक्तिश: पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास रामराव गायकवाड,"श्री मावूली", दत्त मंदिरमागे, ड्रायव्हर कॉलनी, जूना औसा रोड,लातूर - ४१३ ५३१.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा धान्य खरेदी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. झेरकुंटे विरभद्र लिंगप्पा, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, संगायो विभाग, तहसील
कार्यालय,उदगीर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय,उदगीर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८९८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (संगायो) विभाग,उदगीर,जि.लातूर -सौ. सी.एच.लोभे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उदगीर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०७.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०८.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो) विभाग,उदगीर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये राष्ट्रीय

सामाजिक अर्थसहाय्य योजने अंतर्गत लाभार्थींना वाटप केलेल्या अनुदानासंदर्भात सन २००३-०४, २००४-०५, २००५-६ पर्यंतच्या मूळ संचिका मागितल्या आहेत. सदरची संचिका शोधून माहिती देण्यात येईल, असे दि. ०८.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असेही सांगितले की, एकूण १८० संचिका उपलब्ध असून त्या संचिकांच्या झेरॉक्स प्रती कार्यालयात उपस्थित राहून घेऊन जाव्या, असे दि. ०७.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार एकूण १८० संचिकांच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात आल्या आहेत. अपिलार्थी यांनी दि. ११.१२.२००९ रोजी माहिती घेऊन पोच दिलेली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. झेरकुंटे विरभद्र लिंगप्पा,समतानगर,उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो) विभाग,उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिंदे बालाजी निवृत्ती, : अपिलार्थी
रा.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदपूर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक
बांधकाम,अहमदपूर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (इमारती),उस्मानाबाद - श्री. मठपती विजयकुमार गंगाधर | : | उपस्थित |
| ३.३ | सध्याचे जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (इमारती),उस्मानाबाद - श्री. व्ही.एस.करंदे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर - श्री. राजेंद्र सावळेराम राहाणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी (सध्याचे व तत्कालीन) व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन व युक्तिवादावरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.०८.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी निवृत्ती शिंदे,रा.साठेनगर,अहमदपूर, ता.अहमदपूर,जि.लातूर-४१३ ५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (इमारती),उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. हळीघोंगडे अविनाश गुरप्पा,<br>रा.वाढवणा (बु.),ता.उदगीर,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, श्री.शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय,वाढवणा (बु.), ता.उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्राचार्य,शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय,वाढवणा (बु.),ता.उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर - प्रतिनिधी - प्रतिनिधी - श्री. अरगर एस.एच.,शिक्षण विस्तार अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय,वाढवणा (बु.),ता.उदगीर,जि.लातूर या शाळेबाबत एकूण ७ मुद्यावर विविध माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांच्या दि. ०८.०१.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळाली आहे. तथापि द्वितीय अपिलाची कारणे या सदरामध्ये त्यांना अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर प्राचार्य, श्री शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय, वाढवणा(बु.), ता.उदगीर जिल्हा लातूर यांच्याकडून त्यांना संपूर्ण माहिती प्राप्त झाली ओह. यास्तव द्वितीय अपील प्रकरण निकाली काढण्यात यावे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हळीघोंगडे अविनाश गुरप्पा,रा.वाढवणा (बु.),ता.उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय,वाढवणा (बु.),ता.उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शिवराज बापुराव शेटकर,<br>रा.अहमदपूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, अहमदपूर,जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर,जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद,अहमदपूर, जि.लातूर -श्री. बिलापट्टे एस.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर,जि.लातूर - श्री. गायकवाड डी.एन. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सुनावणीच्या वेळी आयोगास त्यांच्या युक्तिवादाद्वारे अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १२.०८.२००९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली व त्यांच्या

कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. यामध्ये एकूण ७२ + ५९ = १४१ पृष्ठे देण्यात आली आहेत. यासाठी अपिलार्थी यांनी ₹२६६/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केलेला आहे. अपिलार्थी यांनी चुकीची व असमाधानकारक माहिती मिळाली आहे असे कारण दर्शवूनमुख्याध्यापक, नगर परिषद, अहमदपूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.११.२००९ रोजीच्या प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी दि. १०.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे योग्यप्रकारे माहिती दिलेली आहे. अर्जदाराने त्यांच्या वडिलांनी दाखल केलेल्या कागदपत्रांची मागणी केलेली होती. परंतु अर्जदाराच्या भावाने दाखल केलेली कागदपत्रे दिलेली आहेत. श्री. बापुराव गुरुबसप्पा शेटकर यांच्या नावाची नोंद रिव्हीजन नुसार झाल्यामुळे त्यांचे नावे नोंद करण्यासाठी कोणतेही कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध नाही.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवराज बापूराव शेटकार,घर नं.ई-२९६,बस्वेश्वर चौक कॉलेज रोड, अहमदपूर, जि.लातूर-४१३५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद,अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कोनाले शंकरअप्पा रामचंद्र, : अपिलार्थी
रा.सावरगाव थोट, ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,सावरगाव
(थोट),ता.अहमदपूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
अहमदपूर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,सावरगाव(थोट),ता.अहमदपूर,जि.लातूर - श्री. वलांडे सी.व्ही. | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, अहमदपूर,जि.लातूर - श्री.बोंबले पी.व्ही. | : | उपस्थित |
| ३.४ | सध्याचे जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, अहमदपूर,जि.लातूर - श्री.बिराजदार ए.एन. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.११.२००९ |

७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख दि. -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १३.०१.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, सध्याचे व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असल्यामुळे ती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी उपलब्ध असलेली माहिती प्रथम दि. ३०.१२.२००९ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती उशिरा मिळाली म्हणून प्रथम अपील दाखल केले. यावर विस्तार अधिकारी (पं.) यांनी दि. १४.०१.२०१० रोजी सुनावणी घेतली. त्यावेळी संदर्भित कामाचे मूल्यांकन झालेले नव्हते. त्यामुळे माहिती देता आली नाही. त्यानंतर मूल्यांकन झाल्याबरोबर यासंदर्भातील माहिती अपिलार्थीस देण्यात आली, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे अपिलार्थीस दि. २१.०१.२०१० रोजी विनामूल्य माहिती देण्यात आली. आयोगापुढे अपिलार्थीने दि. २९.०६.२०११ रोजीचे पत्र आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, या संपूर्ण माहिती मिळालेली आहे. याकरिता प्रस्तुत द्वितीय अपील मागे घेण्याची विनंती आयोगास केली आहे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कोनाले शंकरअप्पा रामचंद्र,रा.सावरगाव थोट, ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव(थोट), ता. अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती,

अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुरेंद्र शिवशंकरप्पा चिंचनसुरे,<br>रा.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत<br>कार्यालय,कासारशिरसी, ता.निलंगा,जि. लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,पंचायत समिती,ता.निलंगा,जि.<br>लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,कासारशिरसी, ता.निलंगा,जि. लातूर - श्री. कामीटे गुलाब नारायण | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी,पंचायत समिती,निलंगा,जि. लातूर- डॉ.उदय आप्पासाहेब पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे कासारशिरसी ग्रामपंचायत अंतर्गत काही भूखंडाच्या नमुना नं. ८ ची माहिती मागितली आहे. ही माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस देण्यात आली नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली. त्यावेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली आहे, असे सांगितले. तथापि त्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पुरावा सादर करु शकले नाहीत. म्हणून त्यांनी चार दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला. यापुढेही तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत माहिती देण्यात आली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक सध्या निलंबित असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे.

सध्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवकाने त्यांच्याकडे अपिलार्थी यांना द्यावयाची माहिती त्यांना उपलब्ध करुन घेतली असून आज सुनावणीच्या वेळी आयोगापुढे सादर केली. तथापि अपिलार्थी अनुपस्थित आहेत. याकरिता आयोगाचे निर्देश असे आहेत की, सध्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी लागेल. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्यावर त्यांनी माहितीची पाहणी करावी. त्यामध्ये काही अपूर्ण आढळल्यास पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांना कळवावे लागेल. पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन उर्वरित देय होत असलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेंद्र शिवशंकरप्पा चिंचनसुरे, शासकीय संक्रमण निवासस्थान (बी ॲण्ड सी)टाईप-१,रुम नं.५ जुना औसारोड,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कासारशिरसी, ता.निलंगा,जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,निलंगा,जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मधुकर (पिंटु) विश्वनाथ धडे,<br>रा.अहमदपूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>धर्मादाय आयुक्त कार्यालय,लातूर विभाग,<br>लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>धर्मादाय आयुक्त कार्यालय, लातूर विभाग,<br>लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मधुकर (पिंटु) विश्वनाथ धडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -अधीक्षक, धर्मादाय उपआयुक्त कार्यालय,लातूर- श्री. क्षीरसागर नारायणराव शंकरराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - धर्मादाय उपआयुक्त, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८.१०.२०९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १३.०८.२००९ रोजीच्या अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"अहमदपूर शहरामध्ये अहमदपूर शहरामध्ये हिंदू धार्मीक मंदिर किती व ट्रस्ट रजिस्ट्रर नोंद किती व त्या मंदिरांची नांवे काय व त्यांच्या ट्रस्ट मेंबरांचे नावे काय व हयाची रजिस्ट्री नोंद कधी करण्यात आली. व मंदिराचे ठिकाण व पत्ता त्या ट्रस्टचे अटी व नियम काय,

त्याच्या किती अंतरात दारु दुकान,कत्तल खाना, मठाण मार्केट व खानावळ,किती अंतरात असले पाहिजे यांची सर्व माहिती मराठी भाषांतरात देण्यात यावी,ही विनंती "

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी यांना समक्ष सांगण्यात आले होते की,न्यासाचे नंबर देण्यात यावेत म्हणजे न्यासाची माहिती देण्यात येईल. तथापि त्यांनी तशी माहिती दिली नाही. सदरील माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे रेकॉर्ड पाहणेसाठी निरीक्षणाचा अर्ज दिला असता तर कार्यालयाच्या अभिलेखाचे निरीक्षण देऊन माहिती देता आली असती. त्याचप्रमाणे मंदिरापासून किती अंतरावर दारु दुकाने,कत्तल खाना,मटण मार्केट व खानावळ असले पाहिजेत याची माहिती त्यांच्याकडे नसते म्हणून देता येत नाही.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांचे सुनावणीच्या वेळी तोंडी म्हणणे नाही. गुणवत्तेच्या आधारे निर्णय द्यावा. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहिले असता असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांचा प्रथम अपील अर्ज कलम १९(१) नुसार विहित मुदतीत सादर न केल्यामुळे मुदतबाहय ठरवून प्रथम अपील फेटाळले आहे. अपिलार्थी यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांनी अहमदपूर शहरामधील सर्व हिंदू धार्मिक मंदिरे व ट्रस्टची माहिती मागितली आहे.अशी मंदिरे व ट्रस्ट अहमदपूर शहरामध्ये अंदाजे ६० ते ७० इतकी असू शकतात. असे सुनावणीच्यावेळी आयोगास आढळून आले. या सर्व बाबी लक्षात घेता व प्रथम अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या प्रथम अपील फेटाळले असले तरी ही बाब बाजूला ठेवून खालील माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ अन्वये देय होत आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

"अहमदपूर शहरामध्ये नोंदणी झालेल्या एकूण मंदिरांची संख्या. त्या मंदिरांची नावे, नोंदणी क्रमांक व दिनांक, मंदिराचे ठिकाण व पत्ता." इतर माहिती अपिलार्थीस उपलब्ध होऊ शकत नाही.अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली.

सदरची माहिती एक विशेष बाब म्हणून जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय,लातूर यांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या संपूर्ण जिल्हयातील एकत्रित माहितीमधून काढून नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्यावी लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीतील त्यांना देय होत असलेली वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०६-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर (पिंटू) विश्वनाथ धडे,हमणे गल्ली, अहमदपूर,ता.अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, धर्मादाय उपआयुक्त कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपआयुक्त, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. काळे बालाजी रावसाहेब,<br>रा.निटुर, ता.निलंगा,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग निलंगा,जि. लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे मंडळ, परळी वैजनाथ,जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे मंडळ, लातूर - श्री. द.व्यं. हंद्राळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ,परळी (वै),जि.बीड- श्री. ब.शं.स्वामी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २१.०९.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये ताजपुर पाझर तलावाअंतर्गत सर्वे नं. ६७/२ व ६७/३ मध्ये झालेल्या अतिक्रमणाबाबतची माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली आहे. या माहितीकरिता ₹१५/- इतके शुल्क भरणा करण्याकरिता दि. ३१.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले. अपिलार्थीने शुल्काचा भरणा दि. ०७.११.२००९ रोजी केल्यानंतर मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. ही माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे, असे नमूद करुन अपिलार्थीने प्रथम अपील सादर केले. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ,परळी (वै),जि.बीड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ०७.१२.२००९ रोजी सुनावणी घेतली आहे. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, त्यांना देय होत असलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिलेली माहिती इत्यादीचा सांगोपांग विचार करुन जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे मंडळ, लातूर यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काळे बालाजी रावसाहेब,मु.पो.निटूर,ता.निलंगा,जि.लातूर-४१३५३०.

२. जन माहिती अधिकारी तथा  कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे मंडळ, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ,परळी (वै),जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अमोल बाळकृष्णराव नानजकर, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,औरंगाबाद - श्री. वा.ना.देशपांडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय,औरंगाबाद - डॉ. ए.आर.थेटे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. उपलब्ध कागदपत्रांवरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २२.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारित

केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय,औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.२२.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अमोल बाळकृष्णराव नानजकर,द्वारा-पटवारी व्ही. डब्ल्यू.,स्वस्तिश्री, व्यंकटेश नगर, अंबाजोगाई रोड, लातूर,ता.जि.लातूर (महाराष्ट्र)

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. जनाबाई संजय व्यवहारे काळे, : अपिलार्थी

रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामपंचायत कार्यालय,अणदूर,ता.तुळजापूर,जि. लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती
कार्यालय,तुळजापूर,जि. लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - सौ. जनाबाई संजय व्यवहारे काळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत, अणदूर, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद - श्री. संजय चन्नबसप्पा माशळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,जि.उस्मानाबाद - श्री. व्ही.के.परळीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,त्यांचे प्रतिनिधी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे ग्रामपंचायत, अणदुर मालमत्ता क्र. २५२ प्रकरणातील दुरुस्त केलेल्या ८-अ च्या नकलेची मागणी केलेली आहे. त्यांना ही माहिती आतापर्यंत प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी केलेल्या अर्जावर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करुन अपिलार्थीस द्यावयाची माहिती आज रोजी सुनावणीच्या वेळी सोबत आणलेली आहे. ही माहिती आयोगाच्या सूचनेनुसार दाखविण्यात आली व अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने त्यांनी मागितलेल्या माहितीप्रमाणे आहे, असे मान्य केले.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या माहितीचे सहा पृष्ठे अपिलार्थीस दिले व ती माहिती अपिलार्थी यांनी स्वीकारली.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. जनाबाई संजय व्यवहारे, रा.अणदूर ह.मु.द्वारा, किरण कुंज, हत्तेनगर रोड क्रमांक - २, लातूर - ४१३ ५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, अणदूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शिशीर कवडुजी घोनमोडे,<br>रा.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, चंद्रपूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, चंद्रपूर | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शिशीर कवडुजी घोनमोड | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, चंद्रपूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.१२.२००९ (नागपूर कार्यालयाकडे प्राप्त)<br>१९.०१.२०१० (औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा

परिषद, चंद्रपूर यांनी आयोगास त्यांच्या दि. ०५.०७.२०११ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली. प्रकरणात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक वाटत आहे. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूरने संदर्भित तक्रार क्र. १८२/०७ मध्ये दिलेल्या आदेशामधील तीन मुद्यांवर केलेल्या कार्यवाहीचा तपशील सोबत आणावा लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिशीर कवडूजी घोनमोडे, द्वारा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, सहकारशक्ती इमारत, शामनगर, अंबेजोगाई रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बोधले गणेश शिवाजीराव,<br>रा.औसा, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद - श्री. आर.व्ही.काकडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे कालबध्द पदोन्नतीसंदर्भात काही माहिती मोघम स्वरुपात मागितली आहे. आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आढळून येत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.१०.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.३०.१०.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०६-०७-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोधले गणेश शिवाजीराव,निदेशक,आय.टी.आय.औसा,ता.औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. स्वामी चंद्रकांत विरभद्रप्पा, : अपिलार्थी
रा.औसा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,औसा,जि. लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. स्वामी चंद्रकांत विरभद्रप्पा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - केंद्रप्रमुख,केंद्रीय प्राथमिक शाळा,औसा,जि.लातूर - श्री. बोयणे एस.आर. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, औसा, जि.लातूर - श्री. के.आर.शिंदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.१२.२००९ (फेरसादर,दि.२५.०१.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. १९.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली आहे, असे सुनावणीच्या वेळी सांगितले. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना संपूर्ण माहिती मिळाली आहे, असे मान्य केले.

या पार्श्वभूमीवर विचाराधीन अपील बंद करण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स्वामी चंद्रकांत विरभद्रप्पा, बँक कॉलनी, मुक्तेश्वर रोड,औसा,ता.औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा केंद्रप्रमुख,केंद्रीय प्राथमिक शाळा,औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुर्यवंशी श्रीनंद संग्राम,<br>रा. आंबेगाव, ता.देवणी,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,तहसील कार्यालय देवणी,जि. लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, देवणी,जि. लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी, मौ. अंबेगाव, ता. देवणी, जि.लातूर - श्री. सुर्यवंशी श्रीनंद संग्राम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मंडळ अधिकारी,देवणी, जि.लातूर - श्री. बनसोडे जी.व्ही. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी (सध्याचे व तत्कालीन) व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सध्याचे जन माहिती अधिकारी तथा तलाठी,सजा अंबेगाव यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे सोयाबिन

अनुदान मंजूर होऊन वाटप केलेल्या यादीप्रमाणे लाभधारकांचे ७/१२ च्या प्रती अशी माहिती मागितली आहे. असे एकूण ५३२ लाभधारक आंबेगाव या गावातील आहेत. या बाबतच्या माहितीचे एकूण १४४८ पृष्ठे होतात. याकरिता अपिलार्थीस समक्ष व व्यक्तिशः माहितीची पाहणी करुन जावे, असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांना कागदपत्रांची पाहणी देण्यात आली. तथापि अपिलार्थीने याबाबत पोच दिलेली नाही. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीचे अभिलेखे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. यासाठी अपिलार्थीस पुन्हा एक संधी देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यवंशी श्रीनंद संग्रामराव,मु.आंबेगाव,पो.गुरनाळ,ता.देवणी,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, मौ. अंबेगाव, ता. देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी,देवणी, जि.लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. केशव नारायण कर्डिले, : अपिलार्थी
रा.चाकूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय,ता.अहमदपूर,जि. लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. केशव नारायण कर्डिले | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय, सताळा,ता.अहमदपूर,जि.लातूर - श्री. हरगीले टी.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,लातूर - श्री. कैलास गोस्वामी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ व्यक्तीची ६ व्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीसंदर्भात काही माहिती व त्यांच्या

सेवापुस्तिकेची सत्यप्रत अशी माहिती दि. ०१.०१.२००६ ते ०१.०८.२००९ या कालावधीची माहिती मागितली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे. तथापि या निर्णयामध्ये त्रयस्थांची बाजू माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम ११ अन्वये ऐकून घेण्याचे आढळून येत नाही. ही बाब नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने व पारदर्शकता राखण्याकरिता जरुरी आहे.

याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०९.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम ११ विचारात घेऊन सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.०९.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. केशव नारायण कर्डिले,रा.ब्राह्मणगल्ली, दत्तमंदीरासमोर,चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय, सताळा, ता. अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दयानंद बाबूराव कुंभार,<br>रा.निलंगा, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ,जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दयानंद बाबूराव कुंभार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -ग्राम विकास अधिकारी, साकोळ, जि.लातूर - श्री.धाकडे अंकूश देवराव | | |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर - श्री. नितीन शेषेराव दाताळ | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. स्वामी दयानंद नागनाथ, अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९.०३.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०८.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०१.२००९ |

(फेरसादर दि.०७.०१.२०१०)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी (सध्याचे व तत्कालीन) व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,शिरुर अनंतपाळ,जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास त्यांच्या युक्तिवादाद्वारे अवगत केले की, त्यांनी साकोळ, ग्रामपंचायतीलमधील नोंदणी फेरफार बुकची सन १९६६ ते दि.०६.०३.२००९ पर्यंतच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. ती माहिती अद्याप त्यांना देण्यात आलेली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ खालील नियम मुंबई ग्रामपंचायत अंदाजपत्रक नियम १९५९ अन्वये अभिलेख्यांचे विविध १ ते २८ नमुने निश्‍चित केले आहे. त्यामध्ये अशाप्रकारच्या फेरफार बुकची नोंद केलेली नाही. त्यामुळे असे रजिस्टर ठेवणे बंधनकारक नाही व असे रजिस्टर उपलब्ध नाही. म्हणून अपिलार्थीस दि. ०२.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. अशाप्रकारचे फेरफार हे महत्त्वाचे असल्याकारणाने कोणत्यातरी स्वरुपात त्यांच्या कार्यालयातील इतर रजिस्टरमध्ये याची नोंद असलीच पाहिजे, याबाबत आयोगाने पृच्छा केली असता आयोगास अवगत करण्यात आले की, नमुना नं. ८ च्या रजिस्टर मधील 'शेरा' या रकान्यामध्ये या माहितीची नोंद करण्यात येत आहे. त्यामुळे अपिलार्थीने जे रजिस्टर मागितले आहे, ते हेच रजिस्टर समजण्यात यावे, अशी विनंती केली. अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य केली.

अपिलार्थी यांनी एकंदर ४४ वर्षांची साकोळ ग्रामपंचायतीची सर्व मालमत्तेच्या फेरफाराची माहिती मागितली आहे. त्यामुळे त्यांना, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार शासकीय योजनेच्या मनुष्यबळावर विपरीत ताण पडणार नाही, अशी नेमकी माहिती मागणे आवश्यक आहे. आयोगाने अपिलार्थीस मागणी केलेल्या माहितीच्या व्याप्ती कमी करुन नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे, हे स्वेच्छेने सांगण्याचे सूचित केले. यावर अपिलार्थी यांनी त्यांना खालील माहिती आवश्यक आहे, असे सांगितले.

" संग्राम वैजनाथ कुंभार यांच्या नावे असलेली जागा बसवंत वैजनाथ कुंभार यांच्या नावे केलेला फेरफार रजिस्टरची प्रत."

जन माहिती अधिकारी यांना ही माहिती उपलब्ध असलेल्या रजिस्टरची पाहणी करण्यासाठी अपिलार्थीस एक दिवस निश्‍चित करुन उपलब्ध करुन द्यावी लागेल. त्यातील काही आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. यामध्ये प्रशासकीय अडचणी उपस्थित होऊ नये, याकडे गट विकास अधिकारी यांना व्यक्तिशः लक्ष पुरवावे लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांना ही माहिती उपलब्ध असलेल्या रजिस्टरची पाहणी करण्यासाठी अपिलार्थीस एक दिवस निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी लागेल. त्यातील काही आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. यामध्ये प्रशासकीय अडचणी उपस्थित होऊ नये, याकडे गट विकास अधिकारी यांना व्यक्तिशः लक्ष पुरवावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०७-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुंभार दयानंद बाबुराव,एम.आय.डी.सी.समोर जोशी निवास,निलंगा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, साकोळ, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती यशोदा सुरेश सोनवणे,<br>गोपिका यशवंत निवास, मेघराज नगर, लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती यशोदा सुरेश सोनवणे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर - प्रतिनिधी - श्री. पी. व्ही. नवसारे, उप विभागीय पोलीस अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय झालेला नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती यशोदा सुरेश सोनवणे, गोपिका यशवंत निवास, मेघराज नगर, लातूर-४१३ ५१२

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामचंद्र निवृत्ती बिरादार, : अपिलार्थी
रा. बेलसकरगा, पो. मोघा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
रिडर उप अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड - श्री. अ. मा. खांडेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>वाचक, पोलीस उप अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड - श्री. व्ही. के. गोगी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी आयोगाच्या निदर्शनास आले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणीसाठी नोटीस काढण्यात आलेली नाही व सुनावणी प्रक्रिया पूर्ण होऊन निर्णय झालेला नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा वाचक, पोलीस उप अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा वाचक, पोलीस उप अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामचंद्र निवृत्ती बिरादार, रा. बेलसकरगा, पो. मोघा, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वाचक, पोलीस उप अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश तुकाराम रोळे, : अपिलार्थी
रा. हलगरा, तालुका निलंगा,जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुरेश तुकाराम रोळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर<br>- श्री. पी. व्ही. नवसारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये डॉ. शिवाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हलगरा, तालुका निलंगा येथील धान्य (तांदुळ) विक्री करण्यासाठी जात असताना पकडून दिल्याबाबत केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत मागितली आहे. या चौकशी प्रकरणी त्रयस्थ साक्षीदार आहेत. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ८ (छ) व कलम ८ (त्र) नुसार माहिती देय होत नाही म्हणून माहिती देण्याचे नाकारले आहे. त्याचप्रमाणे सदर माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने त्रयस्थांनी माहिती देण्यास आक्षेप घेतला आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ११-०१-२०१० रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीनंतर दिनांक ०६-०२-२०१० रोजी प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनीनिर्णय दिला आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (छ) व ८ (१) (त्र) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे ही बाब योग्य दिसून येत आहे. सबब अपील फेटाळण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप, आयोगापुढील युक्तिवाद व जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय विचारात घेता या प्रकरणातील माहितीच्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम कलम 8 (1) (g) व 8 (1) (j) अन्वये माहिती उघड करण्यासाठी आवश्यक असलेल्या व्यापक जनहिताच्या कसोटीची पुर्तता होत नाही असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश तुकाराम रोळे, रा. हलगरा, तालुका निलंगा,जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गिते अंकुश विश्वनाथ, : अपिलार्थी
मु. उमरगा, पो. चेहरा, तालुका जळकोट, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, दिनदयाल माध्यमिक व उच्च माध्यमिक
विद्यालय, बेटसावंगी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०७३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गिते अंकुश विश्वनाथ | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, दिनदयाल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बेटसावंगी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड<br>- श्री. देशपांडे युक्रांद भानुदासराव, | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी दिनांक १८-०३-२०१० च्या माहिती अर्जान्वये मुख्याध्यापक, दिनदयाल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बेटसावंगी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांच्याकडे त्यांच्या संस्थेची घटना व चालू संचालक मंडळ इत्यादी माहिती मागितली आहे. सदर माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक १, ४, ५, ६ ची माहिती संस्थेकडे असल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, दिनदयाल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बेटसावंगी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांनी दिनांक २५-०३-२०१० रोजी संस्थेस अपिलार्थी यांना सदर माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविले आहे व उर्वरित मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती शाळेकडे उपलब्ध असल्याने दिनांक २९-०४-२०१० रोजी नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविली आहे. अपिलार्थी यांनी ही माहिती मिळाली आहे हे मान्य केले. तथापि काही माहिती मिळाली नाही असे सांगितले. अपिलार्थीस याकरिता जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री. संत नामदेव महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांच्याकडे अर्ज करावा लागेल व ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मान्य केली.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २८-०४-२०१० च्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना लिहिलेल्या पत्रामध्ये माहितीसाठी रुपये ५० चा भरणा केला आहे असे म्हटले आहे व भरणा केलेला आहे असे दिसून येत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, दिनदयाल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बेटसावंगी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना अपिलार्थीस माहिती देण्यापोटी आलेला खर्च विचारात घेऊन उर्वरीत रक्कम अपिलार्थीस परत करावी लागेल. या पार्श्वभूमीवर प्रकरण बंद करण्यात येत आहे व आयोगाचे आदेशाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी दिलेल्या शुल्काचा आणि आलेल्या खर्चाचा यथोचित हिशोब ठेऊन आयोगाचे आदेश प्राप्त होताच उर्वरीत रक्कम अपिलार्थीस परत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-०८-२०११**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गिते अंकुश विश्वनाथ, मु. उमरगा, पो. चेहरा, तालुका जळकोट, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, दिनदयाल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बेटसावंगी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. माने नवनाथ माधवराव,<br>मु. वडगांव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडगांव त.,<br>तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर,<br>जिल्हा लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. माने नवनाथ माधवराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडगांव त.,<br>तालुका चाकूर, जिल्हा लातूर - श्री. आर. डी. कुमरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, चाकूर,<br>जिल्हा लातूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०९-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज विचारात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने सन २००७ ते २०१० या कालावधीतील बारावा वित्त आयोगाचा आलेला निधी व खर्च, दलीत वस्ती सुधार योजनेतील आलेला निधी, मोजमाप पुस्तिकाच्या प्रती, ठरावाच्या प्रती, ग्रामनिधी व पाणीपुरवठ्यासाठी आलेला निधी, ग्रामपंचायततर्फे वसूल झालेला निधी व खर्चास मान्यता, घर क्रमांकासह यादी, बिलाच्या प्रती, अंदापत्रकाच्या प्रती अशी विस्तृत माहिती मागितली आहे. ही माहिती संकलीत करणे ग्रामसेवकास शक्य झाले नाही असे दिसून येत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन गांभीर्य नष्ट होते. ग्रामसेवकाकडे असलेल्या मनुष्यबळ व साधनसामग्रीचा विचार करता ही माहिती संकलीत करुन देणे आयोगास शक्य दिसून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०९-०८-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माने नवनाथ माधवराव, मु. वडगांव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडगांव त., तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पवार नंदकुमार नामदेव, : अपिलार्थी
रा. तिवटघाळ, पो. आटोळा व्दारा नळेगांव, तालुका चाकूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर,
जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर,
जिल्हा लातूर

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०७५

२ सुनावणीची तारीख दि. ०९-०८-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
मिस्त्री-१, पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर
- श्री. बाबासाहेब राजाराम साखरे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर,
जिल्हा लातूर
- प्रतिनिधी - श्री. गोविंद शंकर मुळे, कार्यालय अधीक्षक

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०८-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०९-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २४-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०९-०८-२०१० च्या माहिती अर्जान्वये ०१ जून २००९ ते ३० जून २०१० या कालावधीमधील चाकूर तालुक्यासाठी अधिग्रहण केलेल्या विहिरी व बोअरसाठी रकमा देण्यासाठी व इतर विविध खर्चासाठी जिल्हा परिषद यांनी दिलेली रक्कम इत्यादीबाबतची माहिती मागितली आहे. अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांचे आयोगापुढे असलेले दिनांक २५-०७-२०१० चे जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर यांना लिहिलेले पत्र आहे. या पत्रामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमान्वये त्यांनी मागणी केलेली चाकूर तालुक्यासाठी अधिग्रहण केलेल्या विहिरी व बोअरबाबतची संपूर्ण माहिती त्यांना मिळालेली आहे म्हणून त्यांचा अर्ज निकाली काढण्यात यावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पवार नंदकुमार नामदेव, रा. तिवटघाळ, पो. आटोळा व्दारा नळेगांव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मिस्त्री-१, पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मुर्गे किशन विश्वनाथ, : अपिलार्थी

मु. पो. चापोली, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चापोली,
तालुका चाकूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, चाकूर,

जिल्हा लातूर

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०७६

२ सुनावणीची तारीख दि. ०९-०८-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. मुर्गे किशन विश्वनाथ : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित

ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चापोली,
तालुका चाकूर, जिल्हा लातूर

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, चाकूर,

जिल्हा लातूर - श्री. एन. डी. राठोड

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २५-०३-२०१०

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १२-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २५-०३-२०१० च्या माहिती अर्जान्वये एकूण १२ मुद्दयावर विस्तृत माहिती मागितली आहे. ती संकलीत करणे एका महिन्यात शक्य नव्हते तथापि प्रयत्न करुन ९ मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस दिनांक २३-०७-२०१० रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थीने ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य केली. अपिलार्थी यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांना मुद्दा क्रमांक १०, ११ व १२ शी संबंधित माहिती मिळाली नाही. तसेच त्यांना मिळालेल्या माहितीमध्ये मुद्दा क्रमांक ८ ची माहिती अपूर्ण मिळाली आहे. सदर मुद्दयामध्ये त्यांनी ग्रामपंचायतीच्या ठरावाच्या प्रती मागितल्या आहेत त्याऐवजी त्यांना ग्रामसभेच्या ठरावाच्या प्रती देण्यात आल्या आहेत. अपिलार्थी यांनी माहितीपोटी रुपये ५० चा भरणा केलेला आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांचा माहिती अर्ज पाहता अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १०, ११ व १२ ची माहिती देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. यामध्ये मागितलेल्या मोजमाप पुस्तकाच्या झेरॉक्स प्रती तसेच ग्राम विकास अधिकारी यांच्या हस्तांतरण यादीची झेरॉक्स प्रत, त्याचप्रमाणे अपिलार्थीने आयोगास अवगत केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक ८ मधील माहितीच्या प्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपोटी रुपये ५० इतक्या शुल्काचा भरणा केला आहे हे शुल्क जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती उशिराने दिल्याने परत करावे लागेल. ही सर्व कारवाई आयोगाचे आदेश प्राप्त होताच एका महिन्याच्या आत पूर्ण करावी लागेल.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती पाहता व जन माहिती अधिकारी यांच्याकडील साधनसामग्री व मनुष्यबळाचा विचार करता सदरची माहिती एक महिन्यात देणे शक्य नव्हते असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे कलम २० नुसार शास्तीचा विचार करणे आयोगास आवश्यक वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहितीपोटी भरलेले शुल्क रुपये ५० इतके अपिलार्थीस आयोगाचे आदेश होताच तीस दिवसाच्या आत परत करावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. मुर्गे किशन विश्वनाथ, मु. पो. चापोली, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चापोली, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. व्यंकट मनोहर गंभिरे,<br>मु. मुरंबी, पो. सुगाव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर,<br>जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मिस्त्री-१, पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर<br>- श्री. साखरे बाबासाहेब राजाराम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर - प्रतिनिधी<br>- श्री. गोविंद शंकरराव मुळे, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०१-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये तहसील कार्यालय चाकूर यांच्या दिनांक २६-०५-२०१० च्या दिलेल्या पत्रावर काय कार्यवाही केली याबाबतची माहिती मागितली आहे व माहितीचा कालावधी दिनांक २६-०५-२०१० ते २८-०७-२०१० पर्यंत असा दिलेला आहे. अपिलार्थी यांनी दिनांक ०१-०९-२०१० च्या अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक ०७-०९-२०१० देण्यात आलेली आहे आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे अपिलार्थी यांचे जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक १८-१०-२०१० चे पत्र आहे. यामध्ये त्यांना माहिती मिळाली आहे व सदर अर्ज निकाली काढावा अशी विनंती केली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. व्यंकट मनोहर गंभिरे, मु. मुरंबी, पो. सुगाव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मिस्त्री-१, पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ढोके दिलीप नारायण, : अपिलार्थी
बार्शी रोड, हनुमान मंदिरामागे, प्रकाशनगर, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक / प्राचार्य, लालबहादुर शास्त्री माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, जुना औसा रोड, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०७८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, लालबहादुर शास्त्री माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, जुना औसा रोड, लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर<br>- प्रतिनिधी - श्री. आत्राम आर. जी., कक्ष अधिकारी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लालबहादुर शास्त्री माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, लातूर यांच्याकडून त्रयस्थाची माहिती मागितली आहे. सदरचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त न झाल्यामुळे माहिती देता आली नाही असे जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी घेतलेल्या दिनांक २६-११-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी सांगण्यात आले. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. प्रथम अपील सुनावणीच्या वेळी असेही ठरले आहे की, अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांनी संयुक्तपणे माहिती देणे व घेण्याची कारवाई करावी व अपिलार्थीस अभिलेखे पाहण्यास देण्यात यावेत असा निर्णय झाला. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लालबहादुर शास्त्री माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, जुना औसा रोड, लातूर यांनी कारवाई करुन दिनांक १४-१२-२०१० रोजी अपिलार्थी यांना संपूर्ण माहिती दिली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना दिनांक १४-१२-२०१० रोजी लिहिलेल्या पत्रावरुन त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लालबहादुर शास्त्री माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, लातूर यांच्याकडून प्राप्त झाली आहे असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांचे व्दितीय अपील त्यापूर्वीचे म्हणजे दिनांक १६-११-२०१० चे आहे या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ढोके दिलीप नारायण, बार्शी रोड, हनुमान मंदिरामागे, प्रकाशनगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लालबहादुर शास्त्री माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, जुना औसा रोड, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संजीवकुमार पंढरी गायकवाड,<br>रा. जोगाळा, पोस्ट लक्कडजवळगा, तालुका शिरुर अ.,<br>जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजीवकुमार पंढरी गायकवाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अति. जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग,<br>जिल्हा परिषद, लातूर - डॉ. कुलकर्णी जे. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,<br>लातूर | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-१०-२०१० |

फेरसादर दिनांक
२२-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा अर्ज यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी २००९ या कालावधीतील लातूर जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील विविध माहिती मागितली आहे. सदरची माहिती वेगवेगळ्या जन माहिती अधिका-याकडे असल्याकारणाने त्या ठिकाणी माहिती अर्ज अपिलार्थीने पाठविणे योग्य ठरले असते. तथापि जन माहिती अधिकारी तथा अति. जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी विविध ठिकाणावरुन माहिती एकत्रित करुन अपिलार्थीस तीन टप्प्यामध्ये म्हणजे दिनांक १६-०८-२०१० रोजी ३४ प्राथमिक आरोग्य केंद्राची , दिनांक २०-०८-२०१० रोजी ११ प्राथमिक आरोग्य केंद्राची व उर्वरीत एका प्राथमिक आरोग्य केंद्राची माहिती दिनांक २१-०८-२०१० रोजी पोस्टाने पाठविली आहे. अपिलार्थी यांना ही माहिती मिळाली आहे तथापि काही मुद्दयावर त्यांना माहिती प्राप्त झाली नाही असे आयोगास अवगत केले आहे. अपिलार्थी यांनी फार मोठ्या प्रमाणावर माहिती मागितली आहे व विविध प्राथमिक आरोग्य केंद्राबाबतची माहिती मागितली आहे. ती एकत्रित करण्यास शासनाची साधनसामग्री व मनुष्यबळाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. अशी माहिती एका महिन्यात उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे.

या सर्व बाबीचा विचार करता सदरचे प्रकरण या टप्प्यावर बंद करण्यात यावे व त्यानंतर अपिलार्थी यांनी आवश्यक असलेल्या माहितीसाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्रपणे व नेमका माहितीचा अर्ज करावा असे सर्वानुमते ठरले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०९-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजीवकुमार पंढरी गायकवाड, रा. जोगाळा, पोस्ट लक्कडजवळगा, तालुका शिरुर अ., जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अति. जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहंमद शुकूर इस्माईल बागवान, : अपिलार्थी
रा. कोकरंबा, ता.रेणापूर,जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकुन,उपविभागीय अधिकारी कार्यालय, लातूर- श्री. कांबळे लाला सोपान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, रेणापूर,जि. लातूर - श्रीमती सुचिता भिकाने | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सध्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सध्याचे जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात

कार्यालयात समक्ष उपस्थित राहून हवी असलेली माहिती नियमाप्रमाणे फीस भरुन हस्तगत करावी, असे दि. १८.०६.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. त्याचप्रमाणे पुन्हा दि. ३१.०७.२०१० रोजी स्मरणपत्र देऊन संचिकेचे अवलोकन करावे व त्याचप्रमाणे संचिकेतील नेमकी कोणती माहिती हवी आहे, याचा तपशील द्यावा, असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाली व त्यांनी दि.०९.०८.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, तहसीलदार,रेणापूर यांनी अपिलार्थी यांच्या मूळ प्रकरणात तहसिलदार, रेणापूर व मंडळ अधिकारी यांच्या चौकशी अहवालावरुन संबंधित अधिकारी व कर्मचारी दोषी आढळून आले असल्यास त्यांच्याविरुध्द काय कार्यवाही केली किंवा दोषी आढळून आले नसल्यास तसे अपिलार्थी यांना आवश्यक त्या कागदपत्रांसह कळवावे. सदरची माहिती तहसीलदार,रेणापूर यांनी अपिलार्थीस दिली, असे युक्तिवादात पुढे त्यांनी सांगितले. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळाली नाही, असे दिसून येत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहितीचा एक संच पुन्हा एकदा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे माहितीचा एक संच पुन्हा एकदा आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस  दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहंमद शुकूर इस्माईल बागवान,रा. कोकरंबा, ता.रेणापूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन,उपविभागीय अधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, रेणापूर,जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कांबळे निवृत्ती गणपती, : अपिलार्थी
रा.शिवणी (बु.)ता.औसा,जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (संगायो,इंगायो), तहसील कार्यालय,
औसा, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, औसा,जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०८१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (संगायो), तहसील कार्यालय,औसा, जि.लातूर - श्री. गायकवाड बी.एस. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, औसा,जि.लातूर - डॉ. मोहन र. नळदकर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.०५.२०१० (फेरसादर दि.०२.१२.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो), तहसील कार्यालय,औसा, जि.लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २०.०१.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे संगायो,इंगायो,श्रावणबाळ इ. योजनांची सन २००० ते २००९ या ९ वर्षांची फार मोठया प्रमाणावर विविध विषयावर माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असून आवश्यक असलेली माहिती या कार्यालयात समक्ष उपस्थित राहून पहावी व आवश्यक असलेली माहिती हस्तगत करावी, असे जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.०१.२०१० रोजी कलम ७(१) अन्वये विहित मुदतीत अपिलार्थीस कळविलेले आहे. त्याचप्रमाणे झेरॉक्स प्रत काढण्याकरिता निधीची मागणी वरिष्ठांना करण्यात आली आहे व निधी प्राप्त होताच आपणास विनामूल्य प्रती देण्यात येतील, असेही कळविले आहे. अपिलार्थी यांनी ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर घेतलेल्या सुनावणीच्या वेळी कबूल केलेली आहे. तथापि अपिलार्थी यांनी अभिलेखांची अशी पाहणी केलेली नाही किंवा जन माहिती अधिकारी यांच्याकडे निधी प्राप्त झालेला नाही. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता तसेच अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा कालावधी मोठा असल्याकारणाने सदरची माहिती संकलीत करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील साधनसामग्री व मनुष्यबळ मोठया प्रमाणात वळवावे लागणार आहे, ही बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(९) खाली अपिलार्थीस अभिलेख्यांची पाहणी करण्यास उपलब्ध करुन दिली, ही बाब आयोगास योग्य वाटते. याकरिता अपिलार्थीस पुन्हा एकदा संधी देण्यात यावी, असे आयोगाचे निर्देश आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी पुन्हा एकदा अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कांबळे निवृत्ती गणपती,रा.शिवणी (बु.)ता.औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(संगायो), तहसील कार्यालय,औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पुणे जगन्नाथ काशिनाथ, : अपिलार्थी
रा.सोनखेड, ता.अहमदपूर,जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर- श्री. खंदारे बी.बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर,जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि ३०.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ३०.०६.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये किनगाव मंडळाचे सन २००७ ते ३० जून, २०१० पर्यंत एकूण अनुदानित व बिगर अनुदानित साहित्याची यादी उदा. सैंद्रीय,जैविक खते, स्प्रेपंप,हातपंप,औषध इ. ची यादी तसेच किनगाव मंडळात वाटप केलेल्या लाभार्थ्यांची यादी मागितलेली आहे. अपिलार्थीस या माहितीकरिता प्रतिपृष्ठ ₹२/- प्रमाणे ₹३०५२/- या रकमेचा भरणा करावा, असे दि. २०.०७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले व त्यामध्ये कोणत्या लेखाशीर्षाखाली शुल्क भरावयाचे याचा उल्लेख केला आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्यात आली. तसेच ही माहिती देताना किनगाव मंडळाप्रमाणे अहमदपूर, शिरुर,किनगाव यांची एकत्रित माहिती उपलब्ध असल्याने तशी त्यांना देण्यात आली आहे. या माहितीची पृष्ठसंख्या जास्त आहे. यावर अपिलार्थी यांनी आक्षेप घेतला म्हणून अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर तथा अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी भरलेल्या शुल्काची रक्कम त्यांना परत करण्यात यावी व त्यांनी मागितलेली फक्त किनगावची माहिती देण्यात यावी. यानंतर अपिलार्थीस दि. २२.०९.२०१० रोजी माहिती देण्यात आली व त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीस ₹२४८८/- एवढया शुल्काची रक्कम धनादेश क्र.०६२२९०,दि.०८.१२.२०१० द्वारे अपिलार्थीस परत देण्यात आली. हा धनादेश अपिलार्थीस दि. १४.१२.२०१० रोजी प्रत्यक्ष देण्यात आला. याबाबतची पोच तालुका कृषि अधिकारी यांच्या दप्तरी उपलब्ध आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

या सर्व बाबी व आयोगासमोर सादर करण्यात आलेला युक्तिवाद व कागदपत्रे विचारात घेता अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यात आलेली आहे व अपिलार्थीकडून स्वीकारलेल्या शुल्काची रक्कम त्यांना परत करण्यात आली आहे, असे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पुणे जगन्नाथ काशिनाथ, मु.सोनखेड, पो.किनगाव, ता.अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख मुहम्मद खुर्रम अ.रशिदसाब, : अपिलार्थी
रा.निलंगा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वक्फ अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद - श्री.एस.एन.जफर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.१०.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाद्वारे वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ अन्वये नोंदणी न करता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून मंजूरी दिली आहे त्याची यादी मागत आहेत. अपिलार्थी यांनी महाराष्ट्रातील माहिती मागितली असून नेमक्या कोणत्या संस्थेबद्दल नमूद केलेले नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी सांगितले. त्याचप्रमाणे अशा संस्थांच्या कार्यकारिणीची संख्या मोठया प्रमाणावर आहे. यामुळे अपिलार्थीस आतापर्यंत माहिती देण्यात आली नाही. कारण की, याकरिता मोठया प्रमाणात साधनसामग्री व मनुष्यबळ वळवावे लागणार आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद तसेच अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) अन्वये एक दिवस निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे आयोगास योग्य वाटते.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुहमद खुर्रम अ.रशिदसाब, रा.छोटी मस्जिदजवळ, मु.पो.निलंगा,ता.निलंगा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वक्फ अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अधीक्षक अभियंता,
नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०८४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी -श्री. संजयभाऊ जयराम कांबळे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड - श्री. एस.एस.हाशमी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०४.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १७.०६.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे नांदेड पाटबंधारे मंडळांतर्गत श्री. निटुरकर आर.के. अधीक्षक अभियंता यांच्या सर्व साईट पाहणी अहवालाची व पूर्णा प्रकल्प गाळ काढणेबाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली ६३ पृष्ठांची दि. १०.०८.२०१० रोजी व ५४ पृष्ठांची दि. २४.०८.२०१० रोजी माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली तथापि त्यांना काही माहिती अपूर्ण मिळाली आहे, असे सुनावणीच्या वेळी सांगितले. ती अपूर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) मुद्दा क्र. २ मधील कामाचा तपशील मागितला आहे. ती माहिती प्राप्त झाली नाही. त्याचप्रमाणे पाहणी अहवालामध्ये कमी किंवा वाढलेल्या रकमेबाबतची माहिती त्यांना दिलेली नाही.

२) मुद्दा क्र.५ संदर्भातील माहिती प्राप्त झालेली नाही.

यावर राज्य माहिती आयोगाचे निदेश आहेत की, उपरोक्त मुद्दा क्र.२ संदर्भातील माहिती नियतकालिकामध्ये (मासिक, त्रेमसिक,वार्षिक अहवालामध्ये) असू शकते. त्यामुळे त्यांच्या कार्यालयातील संबंधित कामाच्या मासिक/त्रैमासिक/वार्षिक अहवालाच्या प्रती अपिलार्थीस देण्यात याव्यात व त्याचप्रमाणे पाहणीनंतर एखाद्या प्रकल्पाच्या रकमेमध्ये वाढ झाली असल्यास अतिरिक्त सूचीच्या प्रती देण्यात याव्यात.

मुद्दा क्र.५ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, गाळ काढण्याच्या प्रक्रियेसंदर्भातील माहिती एकंदर ९ कार्यकारी अभियंता यांच्या कार्यक्षेत्रातील असल्यामुळे व प्रत्येक कार्यालयात जन माहिती अधिकारी यांची नेमणूक झाली असल्यामुळे त्यांच्याकडे अर्ज करावा, असे अपिलार्थीस त्यावेळी कळविले आहे. यावर अपिलार्थी यांनी स्वतंत्र अर्ज करणे उचित राहील, असे आयोगाने सूचविले. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र.२ मधील माहितीच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०९-०८-२०११**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजयभाऊ जयराम कांबळे,ॲड. गायकवाड यांचे निवास,संत गोरोबा सोसायटी,नांदेड रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुनिल हरिबा मंदाडे, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर अभियंता, नगर परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. एन.एम.देशमुख,शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.११.२०१० (फेरसादर ) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः उपस्थित नाहीत. त्यांची बाजू ऐकून घेणे

आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल हरिबा मंदाडे,काळे गल्ली, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रसाद भालचंद्र वैद्य,रा.लातूर : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, लातूर : उत्तरवादी
जन अपिलीय अधिकारी,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,बांधकाम विभाग क्र.-२,लातूर - श्री. के. आर. छोडमारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, लातूर - श्री. एस.जी.कालिबे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,बांधकाम विभाग क्र.-२,लातूर यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की,

अपिलार्थी यांनी दि. १०.०५.२०१० रोजीच्या मूळ अर्जाद्वारे लातूर शहर पाणी पुरवठा योजनेचे खाजगीकरण व त्यासंदर्भातील इतर अनुषंगिक सविस्तर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी माहितीसाठीचा त्यांचा हा अर्ज प्रथम नगर परिषद कार्यालय,लातूरकडे दि.१२.०५.२०१० रोजी केला होता. त्यांच्याकडून तो दि. १४.०५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला आहे. यावर माहिती संकलीत करुन एकंदर माहितीकरिता शुल्क ₹१८६/- चा भरणा करावा, असे अपिलार्थीस दि. ११.०६.२०१० रोजी कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी दि. २१.०१.२०११ रोजी ₹१८६/- चा भरणा केला आहे व त्याच दिवशी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती दिली आहे. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज दि.१६.११.२०१० रोजीचा आहे. अपिलार्थीस दि. २१.०१.२०११ रोजी माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांची दि.०३.०८.२०११ रोजीची टिपणी आयोगापुढे आहे. त्यामध्ये अपिलार्थी यांनी नमूद केले आहे की, संबंधित कार्यालयाकडे त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांना प्राप्त झाली आहे.

या सर्व बाबी पाहता आयोगाच्या स्तरावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रसाद भालचंद्र वैद्य,हॉटेल मेघमल्हारच्या पाठीमागे, औसा रोड,रामनगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,बांधकाम विभाग क्र.-२,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. माधव पंढरीनाथ गुंडरे,<br>रा.अहमदपूर,जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, शेगाव,जि.बुलढाणा<br>जन अपिलीय अधिकारी,<br>नगर परिषद, शेगाव,जि.बुलढाणा | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,राष्ट्रमाता इंदिरा गांधी नगर परिषद विद्यालय,शेगाव , जि. बुलढाणा - श्री. विलास बाबूलाल जैस्वाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, शेगाव,जि.बुलढाणा - श्री. अ.ब.अढागळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.१०.२०१० (अमरावती कार्यालयाकडे प्राप्त)<br>२१.१०.२०१० (औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, शेगाव,जि.बुलढाणा यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे दि. २४.०५.२०१० रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या दि. ०७.०४.११ रोजीच्या अपील अर्जावर तसेच नगर विकास मंत्री यांच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे. सदरची माहिती राष्ट्रमाता इंदिरा गांधी नगर परिषद विद्यालय,शेगाव या शाळेशी संबंधित असल्याकारणाने अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज शाळेकडे वर्ग करण्यात आला. अपिलार्थी यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. या अपिलावर दि.१६.०७.२०१० रोजी निर्णय घेण्यात आला की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस देण्यात यावी. त्यानुसार मुख्याध्यापक यांनी दि. ३१.०८.२०१० रोजी एकूण १५ मुद्यांवर अपिलार्थीस माहिती पाठविलेली आहे. या बाबी आयोगापुढील कागदपत्रांवरुन दिसून येत आहेत.

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील दि. २३.०९.२०१० रोजीचे आहे. या द्वितीय अपिलामध्ये त्यांनी मूळ माहितीसाठीच्या अर्जाव्यतिरिक्त आणखी इतर मुद्यांशी संबंधित माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. तसेच त्यामध्ये अपुरी व चुकीची माहिती दिली असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांना मिळालेल्या माहितीमध्ये माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या मुद्यांप्रमाणे काही अपूर्ण वाटत असल्यास कळवावे लागेल. पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन उर्वरित माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माधव पंढरीनाथ गुंडरे, द्वारा सुप्रिम मेन्स वेअर व टेलरींग सेंटर, थोडगा रोड, अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,राष्ट्रमाता इंदिरा गांधी नगर परिषद विद्यालय,शेगाव , जि. बुलढाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, शेगाव,जि.बुलढाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुभाष गणपतराव निंबाळकर, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा न्यायाधीश-१,जिल्हा न्यायालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-०८-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुभाष गणपतराव निंबाळकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय,लातूर - श्री. एच.एल.कांबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा न्यायाधीश-१,जिल्हा न्यायालय,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.१०.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.अपिलार्थी,जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी अवगत केले की, त्यांनी माहितीच्या अर्जाद्वारे तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, निलंगा यांनी दि. ३०.०८.२०१० रोजी R.C.A.No.9/2010 मध्ये दिलेल्या निकालातील पॅरा नं. १३,पृष्ठ ११ च्या मजकुरासंदर्भातील माहिती मागितली आहे. मा. न्यायमूर्तींनी R.C.S.No.74/2004 चा दावा अपिलार्थीने दाखल केलेला असून तो प्रलंबित असल्याचे म्हटलेले आहे. तथापि या स्वरुपाचा कोणताही दावा त्यांनी कोठेही दाखल केलेला नाही. त्यामुळे त्यांना यासंदर्भातील माहितीची आवश्यकता आहे. त्यामुळे न्यायमूर्तींनी निकालात उल्लेख केलेल्या R.C.S.No.74/2004 व Exh.26/5 याबाबतची माहिती हवी जी नकलेद्वारे मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जावर त्यांनी दि. २०.१०.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कलम ७(१) नुसार अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली आहे. तसेच अपिलार्थी नमूद प्रकरणात पक्षकार असल्याने त्यासंबंधी माहिती अभिलेखाची तपासणी व इतर बाबीची शहानिशा नियमांतर्गत करु शकतात असे कळविले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.१०.२०१० रोजी निर्णय दिला आहे. यामध्ये अपिलार्थी R.C.S.No.74/2004 व Exh.26/5 च्या नकला विहित पध्दतीनुसार प्राप्त करुन घेऊ शकतात आणि मा. न्यायमूर्तींनी दिलेल्या निर्णयाची कारणमिमांसा देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये येत नसल्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेशी सहमती दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे.त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, या माहितीसंदर्भात तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ निलंगा यांचे दि. १४.१०.२०१० रोजीचे पत्र व R.C.S.No.74/2004 ची निशाणी क्र.१ याच्या प्रती सोबत आणलेल्या आहेत. आयोगाच्या सूचनेनुसार जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.

आयोगासमोर केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०९-०८-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभाष गणपतराव निंबाळकर, स्वातंत्र्य सैनिक नगर, 'कृपासदन रोड', लातूर-४१३ ५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश-१,जिल्हा न्यायालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सूर्यवंशी सुधाकर तुकाराम, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपकुलसचिव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा
परीक्षा नियंत्रक,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१० /रामाआ/अपील/सिआर/१०८९

२ सुनावणीची तारीख दि. ०९-०८-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. सूर्यवंशी सुधाकर तुकाराम : उपस्थित

३.२ सध्याचे जन माहिती अधिकारी - सहायक कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद - श्री. पी. पी.कलावंत : उपस्थित

३.३ तत्कालीन जन माहिती अधिकारी - उपकुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद - श्री. व्ही. बी.मोरे(सेवानिवृत्त) : उपस्थित

३.४ सध्याचे जन अपिलीय अधिकारी - परीक्षा नियंत्रक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद - डॉ. अशोक चव्हाण : उपस्थित

३.५ तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - परीक्षा नियंत्रक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद- डॉ. एस.ए.बनसोडे(सेवानिवृत्त) : उपस्थित

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०.०७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | २४.०८.२००७ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०७.०९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ११.११.२०१० (फेरसादर) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २०.०७.२००७ रोजीच्या अर्जान्वये एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितली आहे. यातील बरीचशी माहिती प्रश्नार्थक, उत्तरे अपेक्षित करणारी अशा प्रकारची आहे. अपिलार्थीस माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात दि. २४.०८.२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव यांनी असे कळविले आहे की, मुद्दा क्र. १ ते ३ च्या संदर्भातील माहिती विद्यापीठ देऊ शकत नाही. कारण ही माहिती विद्यापीठात उपलब्ध नसून सदरचा पत्रव्यवहार हा फक्त एक वर्षापर्यंतच ठेवण्यात येतो व नंतर तो नष्ट करण्यात येतो व मुद्दा क्र ४ ची माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)छ नुसार आपणास देता येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.०४.१०.२००७ रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २४.०८.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती योग्य आहे.अपिलार्थी यांनी मागितलेला १९९७ चा पत्रव्यवहार तसेच राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने विद्यापीठाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती विद्यापीठात उपलब्ध नाहीत. कारण की, विद्यापीठाचा पत्रव्यवहार अभिलेख अधिनियम १३ अन्वये नष्ट केलेला आहे व त्याबाबतच्या छायांकित साक्षांकित प्रती सोबत जोडल्या ओहत. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे की, मुद्दा क्र. ४ संदर्भातील माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(छ) नुसार देता येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात त्यांना मिळालेल्या माहितीच्या संदर्भात पूरक माहितीची मागणी केली. याकरिता त्यांना स्वतंत्र माहितीसाठीचा अर्ज द्यावा लागेल, असे आयोगाने सूचित केले. अपिलार्थी यांना राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने त्यांनी दि. ०६.१०.१९९८ रोजी केलेल्या अर्जाच्या संदर्भातील केस क्र. ९४९/१३/९८-९९, दि. १२.०३.१९९९ च्या पत्राची प्रत दिली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात राष्ट्रीय मानवाधिकार आयोग,दिल्ली यांनी पाठविलेल्या अहवालाची /पत्राची प्रत शोधावी लागेल व ती उपलब्ध झाल्यास

अपिलार्थीस द्यावी लागेल व अशी माहिती उपलब्ध झाली नाही तर त्याची कारणमिमांसा अपिलार्थीस कळवावी लागेल, असे आयोगाचे मत आहे

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-०८-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यवंशी सुधाकर तुकाराम, द्वारा कोराळीकर निवास, वीर फकिरा चौक, खाडगाव रोड, लातूर - ४१३५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.